




पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक २२९ ■ गुरूवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642 ■ Postal Regn. No. AKL DN /283 / 2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




## बरसानाच्या अंगणी रंगांची उधळण !

उत्तर प्रदेशातील बरसाना येथील श्री राधा राणी मंदिरात 'लठमार होळी'चा उत्साह ! नंदगावचे भक्त रंगात न्हाऊन निघाले आहेत.

# व्हीएसआर कंपनीविरोधात गुन्हा दाखल करण्यास नकार

## रोहित पवार आक्रमक; पोलिसांवर दबाव असल्याचा आरोप

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**बारामती:** राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या भीषण विमान अपघातात झालेल्या मृत्यूनंतर पवार कुटुंब आक्रमक झाले आहे. आमदार रोहित पवार यांनी या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी, संबंधित कंपन्या आणि जबाबदार अधिकाऱ्यांवर तात्काळ गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी केली आहे. त्यांच्या भूमिकेला आता अजित पवार यांचे दुसरे पुतणे युगेंद्र पवार यांनीही जोरदार पाठिंबा दिला आहे. दोघेही मिळून व्हीएसआर कंपनीविरोधात थेट पोलिसांत तक्रार दाखल करण्याची मागणी करत आहेत. त्यासाठी दोघेही बारामती पोलिस ठाण्यात दाखल झाले होते. मात्र, पोलिसांनी एफआयआर दाखल केलेला नाही. त्यानंतर रोहित पवार चांगलेच आक्रमक झाले. समर्थकांनीही जोरदार घोषणाबाजी केली.

त्यानंतर रोहित पवार यांनी पत्रकारांशी संवाद साधला. या वेळी रोहित पवार यांनी देशातील कोणत्याही नागरिकाला एफआरआय दाखल करण्याचा अधिकार असल्याचे म्हटले आहे. एफआरआय दाखल करण्यास नकार देण्यात आल्याने रोहित पवार यांनी संबंधीत विमान कंपनीवर अनेक गंभीर आरोप केले आहेत. तसेच या प्रकरणात दोषींना वाचवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचा आरोप केला आहे. रोहित पवार यांनी अजित पवार यांच्या विमान अपघातप्रकरणी घातपाताची शक्यता व्यक्त करत तपास यंत्रणांवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. त्यांनी ऊउर्णं, सीआयडी आणि केंद्रीय विमान वाहतूक मंत्रालयाच्या भूमिकेवर संशय व्यक्त करत न्र्ईं कंपनीला वाचवण्याचा व पुरावे नष्ट करण्याचा प्रयत्न होत असल्याचा आरोप केला. या पार्श्वभूमीवर रोहित पवार मरीन लाईन्स पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करण्यासाठी गेले होते. मात्र, तेथेही गुन्हा दाखल करुन घेण्यास नकार दिल्याचे सांगितले. एफआयआर नोंदवण्याच्या मागणीवरून पोलिस अधिकारी आणि पवार यांच्यात वाद झाला. माध्यमांशी बोलताना पवार म्हणाले की, ऊउर्णंच्या परिपत्रकात न्र्ईं कंपनीच्या २५ पैकी ५ विमाने थांबवण्याचे आदेश दिल्याने संशय अधिक बळावला असून नव्या फौजदारी कायद्याअंतर्गत गुन्हा नोंदवावा, अशी त्यांची मागणी आहे. मात्र, पोलिसांवर कोणाचातरी दबाव असल्याचे जाणवत आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला.

अपघाताच्या दिवशी घडलेला घटनाक्रम सांगताना युगेंद्र पवार यांनी भावनिक शब्दांत अनुभव मांडला. मीच सर्वप्रथम घटनास्थळी पोहोचलो. बारामती विमानतळावर गेल्यावर सुरुवातीला काहीच दिसत नव्हते. त्यामुळे मी गाडी थेट रनवेवर नेली. ११ नंबर रनवेच्या टोकाला सुमारे ५० फूट खाली विमान कोसळलेले दिसले, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या मते, विमान पूर्णपणे जळून खाक झाले होते. संपूर्ण दृश्य धक्कादायक होते. दरम्यान, रोहित पवार यांनी याआधी मुंबईतील मरीन लाईन पोलिस ठाण्यात जाऊन एफआयआर दाखल करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र तिथे तक्रार नोंदवली गेली नसल्याचा आरोप त्यांनी केला. त्यामुळे आता बारामतीत औपचारिक तक्रार देण्याचा निर्णय घेतला असून युगेंद्र पवारही त्यांच्यासोबत जाणार असल्याचे स्पष्ट केले



### जनहित याचिका उच्च न्यायालयात सादर

दरम्यान, या प्रकरणात न्यायालयीन पातळीवरही हालचाल सुरू झाली आहे. अजित पवार यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरलेल्या विमान अपघाताबाबत सीआयडीकडून गुन्हा दाखल करण्याचे आदेश राज्य सरकारला द्यावेत, अशी मागणी करणारी जनहित याचिका उच्च न्यायालयात सादर करण्यात आली आहे. आरटीआय कार्यकर्ते केतन तिरोडकर यांनी ही याचिका दाखल केली आहे. २८ जानेवारी रोजी बारामती येथे झालेल्या अपघातात अजित पवार यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर संपूर्ण राज्यात शोककळा पसरली होती. मात्र अपघाताची कारणे आणि त्यामागील जबाबदारी निश्चित व्हावी, यासाठी स्वतंत्र चौकशीची मागणी याचिकेत करण्यात आली आहे.

### चौकशी निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली आयोगामार्फत

याचिकेत काही गंभीर दावे करण्यात आले आहेत. अजित पवार मूळतः गाडीने बारामतीला जाणार होते. मात्र ऐनवेळी एका खासदाराचा फोन आला आणि त्यांना व्हीएसआर कंपनीच्या विमानाने प्रवास करण्यास प्रवृत्त करण्यात आले, असा दावा करण्यात आला आहे. तसेच ज्यांना मूळ कॅप्टन म्हणून नियुक्त करण्यात आले होते, ते दोघेही ट्रॅफिकमध्ये अडकले होते आणि त्यांचा जबाब अद्याप नोंदवण्यात आलेला नाही, असेही नमूद करण्यात आले आहे. आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे व्हीएसआर कंपनीवर युरोपमध्ये बंदी असल्याचा दावा याचिकेत आहे. भारतात या कंपनीची अधिकृत नोंदणी नसताना तिचे विमान कसे उडाले, याबाबतही प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. या सर्व बाबींची चौकशी उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायमूर्तींच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या आयोगामार्फत व्हावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

# केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या पुढाकाराचे सर्वत्र कौतुक

## शेगावमध्ये आरोग्यसेवेच्या 'महाकुंभ'ला उत्स्फुर्त प्रतिसाद



प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अकोला :** संतनगरी शेगाव येथे सुरू झालेला चार दिवसीय 'राष्ट्रीय आरोग्य मेळावा' सध्या संपूर्ण राज्यात चर्चेचा विषय ठरत आहे. केंद्रीय आयुष मंत्री प्रतापराव जाधव यांच्या पुढाकारातून आणि मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या भव्य उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे. आरोग्यसेवेचा हा मेळावा केवळ उपचारांपुरता मर्यादित न राहता शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीचा मार्गही खुला करत असल्याने त्याला 'आरोग्यसेवेचा महाकुंभ' अशीच ओळख मिळत आहे.

बुधवारी शेगाव येथील विसावा मैदानावर आयोजित या मेळाव्याचे उद्घाटन भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते करण्यात आले. शनिवार, २८ फेब्रुवारीपर्यंत चालणाऱ्या या मेळाव्यात आयुर्वेद, योग, निसर्गोपचार, युनानी आणि होमिओपॅथी अशा विविध आयुष उपचार पद्धतींच्या माध्यमातून नागरिकांना मोफत आरोग्य तपासणी, तज्ज्ञ मार्गदर्शन आणि औषधोपचार उपलब्ध करून देण्यात येत आहेत. आयुष मंत्रालयाच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर आरोग्य सेवा सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न या उपक्रमातून होत असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे.

### आयुष क्षेत्राला नवी चालना

केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या नेतृत्वाखाली देशात आयुष प्रणालीला नवी ऊर्जा मिळत असल्याचे या मेळाव्यातून स्पष्ट होत आहे. केंद्र सरकारच्या सहकार्यामुळे आयुष क्षेत्राला मोठा निधी उपलब्ध झाला असून, त्या माध्यमातून आरोग्यसेवा आणि आयुर्वेदिक शेती यांचा संगम साधण्याचा प्रयत्न होत आहे. या भव्य उपक्रमाला स्थानिक नागरिक, सामाजिक संस्था तसेच विविध क्षेत्रांतील मान्यवरांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे. विदर्भातील नागरिकांनी या आयोजनाबद्दल केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांचे आभार व्यक्त केले असून, जास्तीत जास्त रुग्ण आणि शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहनही करण्यात येत आहे.

### शेतकऱ्यांसाठी नवे आर्थिक दालन

या मेळाव्याची विशेष बाब म्हणजे केवळ आरोग्यसेवा पुरविण्यापुरता तो मर्यादित नसून शेतकऱ्यांच्या आर्थिक सबलीकरणावरही विशेष भर देण्यात आला आहे. विशेष म्हणजे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांच्या संकल्पनेतून हा उपक्रम राबविला गेला. शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीसोबत आयुर्वेदिक औषधी वनस्पतींची लागवड करावी, यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन व प्रात्यक्षिके आयोजित करण्यात आली आहेत. उत्पादित औषधी वनस्पतींवर प्रक्रिया करून त्यांना राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत कसे पोहोचवायचे, याबाबत माहिती देणारी विशेष दालने उभारण्यात आली आहेत. आयुष पर्यटन आणि औषधी वनस्पती उद्योगाच्या माध्यमातून स्थानिक पातळीवर मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

## एनसीईआरटीवर चीफ जस्टिस भडकले

**नवी दिल्ली :** राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या इयत्ता ८ वी च्या पाठ्यपुस्तकात न्यायपालिकेतील करप्शनशी संबंधित एका धड्याचा समावेश करण्यावर सर्वोच्च न्यायालयात सुनावणी झाली. सुनावणी दरम्यान चीफ जस्टिस सूर्यकांत यांनी या निर्णयावर कठोर टीका केली. 'हे न्यायपालिकेवर पहिली गोळी चालवण्यासारखं आहे. 'न्यायपालिका भ्रष्ट आहे हे शिक्षक आणि विद्यार्थ्यांना शिकवलं गेलं, तर यामुळे समाजात भ्रम पसरेल, चुकीचा संदेश जाईल' असं सुद्धा ते म्हणाले.







CLASSIFIED

**प्लॉट प्लॉट प्लॉट**

नवीन लेआउट तपस्या नगरी फक्त २,५०,०००/- च्या ३ सोप्या किस्ती ११ महिने मुदत मधे प्लॉट

पत्ता :- मौजे मालेगाव, हनुमानगडी समोर, छत्री तलाव रोड दस्तुर नगर अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8263923606 7757905649

**सिध्दार्थ वधू-वर सूचक केंद्र**

मुला-मुलींचे तसेच घटस्फोटीत यांची नाव नोंदणी करण्यात येईल. याची फी ५०० रुपये राहील. (फक्त बौध्द समाजातील मुला-मुलींकरीता)

-:संपर्क:- सिध्दार्थ दामोधरे अमरावती मो.9545000880

**फ्लॅट फ्लॅट फ्लॅट**

नवीन कंस्ट्रक्शन रेडी टू मूव फ्लॅट अमरावतीच्या मधोमध तेही आपल्या बजट मधे फक्त १६,९९,९९९/- मधे नवीन बांधकाम मधे फ्लॅट

पत्ता:- देसाई लेआउट, गणेश कॉलनी जवळ राजापेठ, अमरावती

अधिक माहिती साठी संपर्क

मो. 8468872250 8788432278


## वाल्मीक कराडला सर्वोच्च न्यायालयाचा दणका!

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**बीड :** जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणातील मुख्य आरोपी वाल्मीक कराड याला सर्वोच्च न्यायालयातून मोठा धक्का बसला आहे. हायकोर्टाने जामीन अर्ज फेटाळल्यानंतर, आता सुप्रीम कोर्टानेही त्याचा अर्ज फेटाळून लावला आहे. न्यायमूर्ती एम.एम. सुंदरेश यांच्या खंडपीठासमोर आज या अर्जावर सुनावणी झाली.

या प्रकरणात वाल्मीक कराडने यापूर्वी बीड जिल्हा न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात जामीन तसेच दोषमुक्तीचा अर्ज दाखल केला होता. मात्र गुन्ह्याचे गांभीर्य आणि उपलब्ध पुरावे लक्षात घेता, दोन्ही

# बारावीपेक्षा दहावीचे विद्यार्थी समजूतदार ! कॉपीमुक्त अभियानाला दिला सहकार्याचा हात

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अकोला :** राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या परीक्षा कॉपीमुक्त व्हाव्यात यासाठी जिल्हा प्रशासन व शिक्षण विभागाने कंबर कसली आहे. याला दहावीच्या विद्यार्थ्यांनी सहकार्याचा हात देत दोन सत्रात परीक्षा होऊनदेखील राज्यभरात एकही कॉपीची घटना समोर आली नाही. याउलट बारावीच्या प्रत्येक विषयाच्या कॉपीच्या घटना उघड होत असून, बुधवार २५ नोव्हेंबर रोजी अकोल्यातील सस्ती येथील एका विद्यार्थ्याला कॉपी करताना पकडण्यात आले आहे. राज्यात बुधवारी सकाळच्या सत्रात बारावीचा 'जीवशास्त्र, भारतीय संगीताचा इतिहास व विकास' या विषयाचा पेपर झाला. यावेळी कॉपीचे एकूण २१ प्रकार समोर आले आहेत. राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने ही माहिती दिली.

दहावीसाठी सकाळच्या सत्रात द्वितीय किंवा तृतीय भाषा या विषयाची, तर दुपारच्या सत्रात द्वितीय वा तृतीय भाषा (संयुक्त अभ्यासक्रम) या विषयाची परीक्षा पार पडली. यामध्ये दहावीच्या दोन्ही पेपरसाठी एकही कॉपीचा प्रकार घडला नाही, त्याउलट बारावीत मात्र २१ कॉपी प्रकार समोर आले आहेत.

### सस्ती येथे धाड, एक कॉपीबहाद्दर पकडला

येथील स. ल. शिंदे कनिष्ठ महाविद्यालय येथे इयत्ता बारावीच्या परीक्षेदरम्यान कॉपी प्रकरण उघडकीस आले. बुधवारी दुपारी १.४५ वाजता जीवशास्त्र विषयाचा पेपर सुरू असताना उपशिक्षणाधिकारी (माध्यमिक) प्रमोद टेकाडे यांच्या भरारी पथकाने परीक्षा केंद्राला अचानक भेट देत तपासणी केली. या कारवाईत एका विद्यार्थ्याविरुद्ध कॉपी केस नोंदविण्यात आल्याची माहिती विभागीय मंडळाच्यावतीने देण्यात आली. नियमित तपासणीदरम्यान विद्यार्थ्याची झडती घेण्यात आली. त्यावेळी परीक्षेसंदर्भातील लिखित चिठ्ठी (अनुचित साधन) आढळल्याने नियमानुसार कॉपी प्रकरण दाखल करण्यात आले.

# व्यावसायिक गॅस वापराचा फलक लावा -जिल्हाधिकारी

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अकोला :** जिल्ह्यासह शहरातील विविध मंगलकार्यालये, लॉन्स आणि कॅटरिंग सेवा देणारे सर्रास घरगुती गॅस सिलिंडरचा वापर करीत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्याच्या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी वर्षा मिना यांनी मनपा उप आयुक्तांना पत्र पाठवून अशा ठिकाणी 'व्यावसायिक गॅस वापराबाबत' फलक दर्शनी भागात लावण्याचे पत्राद्वारे निर्देश दिले आहेत. त्यामुळे आता सर्वच मंगल कार्यालये, लॉन्सवर तसे फलक झळकणार आहेत.

जिल्हाधिकारी यांना नितीन सोळंके यांनी मेलद्वारे निवेदन पाठवून जिल्ह्यासह शहरातील अनेक मंगल कार्यालये, लॉन्स व कॅटरिंग सेवा देणारे घरगुती गॅसचा वापर व्यावसायिक कामासाठी करीत असल्याचे म्हटले आहे. जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर मंगल कार्यालये, लॉन आणि कॅटरिंग सेवा कार्यरत आहेत. नियमानुसार अशा व्यावसायिक ठिकाणी केवळ व्यावसायिक गॅस सिलिंडर वापरणे बंधनकारक आहे. तथापी, अनेक ठिकाणी अजूनही घरगुती गॅस सिलिंडरचा अवैध वापर होत असल्याचे दिसून येते, ज्यामुळे अन्न नागरी पुरवठा विभागाच्या नियमांचे उल्लंघन असून असुरक्षित देखील आहे. यावर प्रतिबंध घालण्यासाठी आणि जनजागृती करण्यासाठी प्रशासनामार्फत सूचनांचे एक परिपत्रकच निर्गमित करण्यात यावे, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे आपल्या अधिनस्त असलेल्या व्यावसायिक सर्व ठिकाणी मंगल कार्यालये, लॉन आणि कॅटरिंग सेवा, लहान मोठे खाद्यान्न हॉटेल, रेस्टॉरन्ट, आहारगृह, खानावळ, हातगाड्या अशा सर्व व्यावसायिक ठिकाणी 'येथे केवळ व्यावसायिक गॅस सिलिंडरचाच वापर केला जातो' असे फलक / बोर्ड दर्शनी भागात लावणे बंधनकारक आहे. घरगुती गॅस सिलेंडरचा वापर फक्त घरगुती वापर करण्यासाठीच असून घरगुती गॅसचा अवैध वापर करणाऱ्या प्रकारांना आळा बसणे आवश्यक आहे. ƃ




# अमरावतीत रंगणार 'वैदर्भी महोत्सव - जागर स्त्री शक्तीचा'

**अमरावती:** महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान-उमेद अंतर्गत अमरावती येथे विभागीय मिनी सरस व जिल्हा प्रदर्शनी 'वैदर्भी महोत्सव - जागर स्त्री शक्तीचा'चे आयोजन करण्यात आले आहे. हे प्रदर्शन येत्या दि. ४ ते ८ मार्च या कालावधीत सायन्स स्कोर मैदानात होणार आहे. यात प्रदर्शनात अमरावती विभाग व जिल्ह्यातील महिला बचतगटांच्या उत्पादनांची विक्री व प्रदर्शनासाठी एकूण १५० स्टॉल्स लावण्यात येणार आहेत. दररोज अमरावती तसेच इतर जिल्ह्यांतील सुमारे एक हजार महिला महोत्सवात उपस्थित राहतील. या प्रदर्शनादरम्यान महिला सक्षमीकरणासाठी विविध सांस्कृतिक कार्यक्रम, स्पर्धा आणि प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे. ग्रामीण भागातील महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना हक्काची बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि महिलांचे आर्थिक सक्षमीकरण करणे हा या महोत्सवाचा मुख्य हेतू आहे. या महोत्सवाला नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रिती देशमुख यांनी केले आहे.

# कृषी क्षेत्रातील सौर ऊर्जेच्या कामगिरीसाठी महावितरणला बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्ड

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अमरावती:** राज्यातील ४५ लाख शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी राज्य शासनाच्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महावितरणचा नवी दिल्ली येथे बुधवारी (दि. २४) २०२६ च्या बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्डने गौरव करण्यात आला. केंद्रीय नवीन व नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्री. श्रीपाद नाईक यांच्याहस्ते मुख्य अभियंता श्री. ज्ञानेश कुलकर्णी यांनी हा पुरस्कार स्वीकारला.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनात तब्बल १६ हजार मेगावॅट विकेंद्रीत सौर ऊर्जा निर्मितीसाठी मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० ची अंमलबजावणी सुरू आहे. राज्याच्या अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला आणि महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनीही या योजनेला मोठी गती दिली आहे.

बिल्ड इंडिया इन्फ्रा अवॉर्डसाठी रस्ते, बंदरे, वीज, शहरी वाहतूक, पाणी आदी ८ क्षेत्रांतील पायाभूत सुविधा प्रकल्पांचे मूल्यमापन करण्यात येते. यंदा देशातील सुमारे १४५ प्रकल्पांचे मूल्यमापन करून निती आयोगाचे माजी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. अमिताभ कांत यांच्या अध्यक्षतेखालील २५ सदस्यांच्या निवड समितीने पुरस्कारांसाठी प्रकल्पांची निवड जाहीर केली. यात वीज क्षेत्रामध्ये मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महावितरणची देशपातळीवर पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. जगातील सर्वांत मोठा विक्रेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्प असलेल्या मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० मध्ये आतापर्यंत १९८५ कृषीवाहिन्यांचे सौर ऊर्जीकरण करण्यात आले असून राज्यातील तब्बल १० लाख २५ हजारांपेक्षा अधिक शेतकऱ्यांना सिंचनासाठी दिवसा वीजपुरवठा उपलब्ध झाला आहे. या योजनेमुळे ६५ हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीसह ७० हजारांवर ग्रामीण रोजगार निर्मिती सुरू आहे. तसेच महावितरणच्या वीज खरेदीमध्ये १० हजार कोटींच्या वार्षिक बचतीसोबतच क्रॉस सबसिडीमध्ये १३ हजार ५०० कोटींनी वार्षिक बोजा कमी होणार आहे. तब्बल २३१ विकासकांकडून या योजनेमध्ये १६ हजार मेगावॅटचे विकेंद्रित सौरऊर्जा प्रकल्प वेगाने उभारण्यात येत आहेत. शेतकऱ्यांना प्रामुख्याने दिवसा व शाश्वत वीजपुरवठा करणे, वीज खरेदीचा व पर्यायाने अनुदानाचा बोजा कमी करणे, औद्योगिक व व्यावसायिक वीजदर कमी करणे यासाठी मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० अत्यंत उपयुक्त ठरत आहे.

# खुनाच्या गुन्ह्यातील आरोपी अटकेत

♦ अमरावती शहर गुन्हे शाखे कडुन अवघ्या सहा तासाचे आत खूनाच्या गुन्हातील आरोपी ताब्यात

प्रतिनिधी २६ जानेवारी

**अमरावती :** पोलीस स्टेशन राजापेठ हददीमध्ये शिशा बार जवळ एक इसमाचा खून झाल्याबाबतची माहीती प्राप्त झाल्याने पोलीस आयुक्तालयाती सर्व वरिष्ठ अधिकारी यानी घटनास्थळावर भेट दिली. असता दोन इसमाचे भांडण होउन त्यामध्ये एका अज्ञात इसमाने मृतक नामे शुभम किशोर ठाकरे रा गोपाल नगर याला धारदार शस्त्राने मारून ठार केल्याची प्राथमीक माहीती प्राप्त झाली होती.



सदर गुन्हाचे घटनास्थळावर तात्काळ पोनि संदीप चव्हाण, गुन्हे शाखा यांनी स्टाफ सह भेट दिली असता, गुन्हयाबाबत सविस्तर माहीती घेतली असता मृतक व आरोपी याचा कोणत्यातरी कारणावरून भांडण झाल्याची माहीती मिळाली गुन्हयातील आरोपी बाबत कोणतीही माहीती नसताना तात्काळ आरोपी निष्पन्न करून आरोपी अनूप दिपकराव पांडे वय ४१ मूळ राहण्याचे ठिकाण दापोरी खूर्द ता तिवसा ह. मु बावनकुळे यांचे घरी भाडयाने स्वस्तीक नगर अमरावती यास स्वस्तीक नगर येथून त्याचे प्लॅटीनम गाडी सह ताब्यात घेतले. त्याचे कडे गुन्हा संबधाने प्राथमीक तपास केला असता आरोपी व मृतक याचेत दारू पिण्याचे कारणावरून भांडन होवून आरोपी याने मृतक याला छोटया चाकूने मारून खून केल्याचे सांगीतले आहे. सदर घटनेसंदर्भाने पोलीस स्टेशन राजापेठ येथे खूनाचा गुन्हा नोंद होण्याची कार्यवाही चालू आहे. आरोपी यांचेवर यापूर्वी पोलीस स्टेशन तिवसा येथे दूखापतीचा गुन्हा नोंद आहे. सदरची कारवाई . पोलीस आयुक्त राकेश ओला अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (गुन्हे), रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे शाखा) शिवाजी बचाटे, सपोआ कैलास पुंडकर गाडगेनगर विभाग यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात स.पो.नि. मनिष वाकोडे, स.पो.नि. महेश इंगोले, सपोनी अमोल कडू, पोउपनि गजानन सोनुने, पोलीस अंमलदार सुनिल लासुरकर, फिरोज खान, प्रभात पोकळे, वेतन शर्मा, राहुल दुधे, यांनी केली.

# घातक शस्त्रासह रिल्स बनवुन सोशल मीडियावर दहशत पसविणाऱ्या दोघांना अटक

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अमरावती :** गुन्हे शाखा, अमरावती शहर यांना गुप्त माहीती मिळाली की, दोन इसम हे काही दिवसा पासुन शस्त्रासह रिल्स बनवुन सोशल मीडीयावर प्रसारीत करीत आहे. ते दोन इसम आज दिनांक २५/०२/२०२६ रोजी वडाळी गार्डन येथे शस्त्रासह रिल बनविण्याचे तयारीत उभे आहेत. अशा मिळालेल्या माहीती वरून पोलीस निरीक्षक गुन्हे शाखा अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा येथिल पथकाने सदर रील्स बनविणारे इसम लोकेश राजेश




वाटकर वय १९ वर्ष रा. दत्तवाडी महाजनपुरा अमरावती राम राजु तायडे वय २१ वर्ष रा. कुंभारवाडा पो. स्टे खोलापुरी गेट अमरावती यास ताब्यात घेवुन त्यास विचारपुस करून नमुद त्यांचे ताब्यातुन एक लोखंडी चाकु, एक स्टीलच चायना चाकु असे एकुण दोन शस्त्रे जप्त करून त्यांचे विरूध्द पोलीस स्टेशन फेजरपुरा येथे कलम ४/२५ आर्म अॅक्ट सहकलम १३५ मपोका प्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे.

त्याच्या ताब्यातून एक लोखंडी चाकु कि.अ .१,०००/- रू., एक स्टीलच चायना चाकु कि.अं. १०००/- रू. असे एकुण दोन नग चाकु कि.अं. २०००/- रू. चा मुद्देमाल जप्त सदरची कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, अमरावती शहर यांचे मार्गदर्शनाखाली, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त श्याम घुगे, पोलीस उपायुक्त (गुन्हे), रमेश धुमाळ, सपोआ (गुन्हे शाखा) शिवाजी बचाटे, यांचे मार्गदर्शनात गुन्हे शाखा चे पोलीस निरीक्षक संदिप चव्हाण यांच्या नेतृत्वात स.पो.नि. महेश इंगोले, पोलीस अंमलदार गजानन ढेवले, मनोज ठोसर, आस्तिक देशमुख, मंगेश परिमल, विशाल वाकपांजर, नापोका मिर्झा नईम बेग, विकास गुडधे, योगेश पवार, पोहेका संदीप खंडारे यांनी केली आहे.

# स्वीकृत नगरसेवक प्रा. संजय तिरथकर यांनी माजी खा. नवनीत राणा यांचे केले स्वागत

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अमरावती :** गंगा सावित्री निवासस्थानी भाजपा नेत्या तथा खासदार नवनीत राणा यांची भाजपा नवनिर्वाचित स्वीकृत नगरसेवक प्रा. संजय तिरथकर तसेच भ्एझ् च्या नगरसेविका व स्थायी समिती सदस्या सौ. प्रियंका भुषण पाटने यांनी सदिच्छा भेट घेतली. या प्रसंगी खासदार नवनीत राणा यांनी प्रा. संजय तिरथकर व सौ. प्रियंका भुषण पाटने यांचे पुष्पगुच्छ देऊन मनःपूर्वक स्वागत केले. दोन्ही नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींना भविष्यातील राजकीय व सामाजिक वाटचालीसाठी शुभेच्छा देत त्यांनी शहराच्या विकासासाठी एकत्रितपणे कार्य



करण्याचे आवाहन केले. जनतेच्या समस्या सोडविणे, प्रभागातील मूलभूत सुविधा मजबूत करणे आणि विकासकामांना गती देणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. प्रा. संजय तिरथकर यांनी नवनीत राणा यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभागातील प्रलंबित कामे पूर्ण करण्याचा निर्धार व्यक्त केला. तर सौ. प्रियंका भुषण पाटने यांनीही नागरिकांच्या प्रश्नांवर प्राधान्याने काम करून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. यावेळी उपमहापौर सचिन भेंडे, सुनिल खराटे, भुषण पाटने, वेंदात तिरथकर, प्रिया तिरथकर आदी मान्यवर उपस्थित होते. भेटीदरम्यान शहरातील विविध विकासकामांबाबत चर्चा करण्यात आली असून आगामी काळात नागरिकांच्या हितासाठी समन्वयाने कार्य करण्याबाबत सकारात्मक चर्चा झाली.

# कृषी पुरस्कारासाठी ऑनलाईन सुविधा

**अमरावती:** शेती व पूरक क्षेत्रात अतुलनीय व उल्लेखनीय कार्य करणाऱ्या शेतकरी, महिला, व्यक्ती तसेच संस्थांचा कृषी विभागामार्फत दरवर्षी सन्मान करण्यात येतो. यावर्षीपासून या पुरस्कारासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. यासाठी शेतकऱ्यांनी तातडीने अर्ज करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. राज्य शासनातर्फे डॉ. पंजाबराव देशमुख कृषिरत्न, वसंतराव नाईक कृषिभूषण, जिजामाता कृषिभूषण, वसंतराव नाईक शेतीमित्र, वसंतराव नाईक शेतीनिष्ठ शेतकरी, उद्यानपंडित पुरस्कार, कृषिभूषण (सेंद्रिय शेती), युवा शेतकरी पुरस्कार तसेच कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्यासाठीचा पद्मची डॉ. विठ्ठलराव विखे पाटील कृषी सेवारत्न पुरस्कार देण्यात येतात.

# पी. आर. पोटे पाटील कॉलेजच्या विद्यार्थ्यांची शैक्षणिक सहल

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर च्या प्रथम व द्वितीय वर्ष डिग्री व डिप्लोमा च्या विद्यार्थ्यांकरिता शैक्षणिक सहलीचे तसेच टेक्निकल फिल्ड व्हिजिट चे आयोजन करण्यात आले होते सदर व्हिजिटमध्ये सर्वप्रथम महिमापुर येथील स्टेप वेल ची विद्यार्थ्यांनी पाहणी केली सरपंच श्री अमोल पाटील वाटाणे यांनी विद्यार्थ्यांना देवगिरी साम्राज्यातील १२ व्या शतकातील ऐतिहासिक महिमापुर पाय विहिरी बद्दल इत्यंभूत माहिती दिली, विहीर निर्माण करण्याकरिता लागणाऱ्या विटा तसेच दगड व इतर साहित्य तसेच विहीर मजबुती करिता काय उपाययोजना केल्या होत्या हे जाणून घेतले, यानंतर सरपंच अमोल पाटील वाटाणे यांनी सर्व शिक्षक वर्ग व विद्यार्थ्यांचे ग्रामपंचायत कार्यालय येथे स्वागत केले व आर्किटेक्चरच्या विद्यार्थ्यांना ग्रामपंचायत च्या योजना कशा असतात व त्याची प्लॅनिंग कशी करावी याविषयी



माहिती दिली. याप्रसंगी महाविद्यालयाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला दरम्यान

विध्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नाची समाधान पूर्वक उत्तर व माहिती सरपंच श्री.अमोल वाटणे यांनी दिली. पुढील सत्रात श्री संत गाडगेबाबा गौरक्षण चॅरिटेबल ट्रस्ट माऊली धांडे येथे भेट दिली व तेथील गौरक्षण तसेच पर्यावरण विषयी चालू असलेले कार्य याबाबत माहिती जाणून घेतली. प्राध्यापक गजानन भारसाकळे यांनी सर्व शिक्षक वर्गाचे व विद्यार्थ्यांचे स्वागत केले. या प्रसंगी त्यांनी विध्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व आपले अनुभव सांगितले, व विध्यार्थ्यांना काही सूचना दिल्या जेणेकरून पुढील आयुष्यात त्यांना आपले ध्येय प्राप्त करता येईल. प्रा भारसाकळे यांनी मिळविलेल्या तीन पेटेंट बद्दल विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती दिली.

पी.आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर च्या वतीने प्रा. गजानन भारसाकळे यांचा विद्यार्थ्यांनी बनविलेली कलाकृती देऊन सत्कार करण्यात आला

कार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यात लासुर येथील आनंदेश्वर मंदिराला विद्यार्थ्यांनी भेट दिली तेथील मंदिराची संपूर्ण माहिती सेवानिवृत्त मुख्याध्यापक श्री गणेश रामेकर यांच्याकडून जाणून घेतली त्यांनी मंदिराचे पौराणिक महत्त्व, बांधकामाची शैली, वापरण्यात आलेले साहित्य, मंदिराची सुरक्षा याविषयी सर्व माहिती दिली. विद्यार्थ्यांनी संपूर्ण मंदिराचे आतील तसेच बाहेरच्या बाजूने मोजमाप करून डॉक्युमेंटेशन करिता आवश्यक असलेली सर्व माहिती गोळा केली याप्रसंगी पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर च्या वतीने श्री गणेश रामेकर यांचा सत्कार करण्यात आला. ही शैक्षणिक फिल्ड व्हिजिट प्राचार्य संजय देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली व प्राध्यापक राम विघे यांच्या पुढाकाराने करण्यात आली, आकि. प्रा. स्नेहल विधळे, आकि.प्रा. तृप्ती भामकर प्रा. भूपेंद्र जयस्वाल, हरीश पळसोकार प्रामुख्याने उपस्थित होते. फिल्ड व्हिजिट ची विध्यार्थी संयोजिका म्हणून बी आर्च द्वितीय वर्षाची विद्यार्थिनी ज्ञानेश्वरी कडू हिने आपली जबाबदारी पार पाडली. सदर शैक्षणिक फिल्ड व्हिजिटमध्ये सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय आनंद लुटला.

# सामाजिक न्यायच्या राज्यस्तरीय स्पर्धेत अमरावती विभागाला सर्वसाधारण विजेतेपद



प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अमरावती:** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या छत्रपती संभाजीनगर येथील राज्यस्तरीय क्रीडा व कला स्पर्धेत अमरावती विभागाने सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले. अमरावती विभागाच्या टेबल टेनिस महिलामध्ये प्रथम क्रमांक स्नेहल काळवाघे, बॅडमिंटन पुरुष दुहेरी मध्ये निरज चारोळे, प्रथम डुलगज, गोळा फेक महिलामध्ये प्रथम रुपाली अपराजित, गोळा फेक पुरुषमध्ये प्रथम ज्ञानेश्वर साळवे, कबड्डी पुरुष गटात अमरावती विभाग प्रथम, व्हॉलीबॉल महिला गटात अमरावती विभाग प्रथम, रस्सीखेच महिला गटात अमरावती विभाग प्रथम, क्रिकेट पुरुष व महिला गटात प्रथम क्रमांक, समूह नृत्य अमरावती विभाग प्रथम, भूमिका अभिनयात शिवचरित्र्य सादरीकरणामध्ये अमरावती विभाग प्रथम ठरला आहे. तसेच प्रादेशिक उपायुक्त माया केदार यांनी अभिनयामध्ये साकारलेली राजमाता जिजाऊची भूमिका अत्यंत प्रभावी ठरली.

शिखा गरकल-केदार हिने बालशिवाजी, पवन साबळे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांची भूमिका साकारली. अमरावती विभागाच्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल सामाजिक न्याय विभागाचे सचिव हर्षदिप कांबळे, आयुक्त दिपा मुधोळ-मुंडे यांनी स्वागत केले आहे.

# वसतिगृह प्रवेशासाठी आधार, स्वयंम योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन

♦ इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी १० मार्च अंतिम मुदत

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अमरावती:** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून इतर मागास वर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शासकीय वसतिगृह प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. विद्यार्थ्यांना ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना आणि पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेचा लाभ घेण्यासाठी दि. १० मार्चपूर्वी अर्ज करावे लागणार आहे.

बारावीनंतरच्या बिगर व्यावसायिक व व्यावसायिक अभ्यासक्रमात प्रथम वर्षाला प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनांचा लाभ घेण्यासाठी शासकीय वसतिगृहामध्ये अर्ज करणे अनिवार्य आहे. अर्ज hmas.mahait.org या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने स्वीकारले जाणार आहे. मुलांनी इतर मागास बहुजन कल्याण मुलांचे शासकीय वसतिगृह, अग्रवाल टॉवर, जाफरीन प्लॉट, आदर्श होटेलजवळ, कॉटन मार्केट रोड, अमरावती. तसेच मुलींनी इतर मागास बहुजन कल्याण मुलींचे शासकीय वसतिगृह, ब्लॉक ए, राम लक्ष्मण संकुल, तिसरा मजला, रामपूरी कॅम्पजवळ, विलासनगर चौक, अमरावती या वसतिगृहामध्ये सादर करावेत. गुणवत्तेनुसार पहिली निवड यादी ११ मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. या यादीतील पात्र विद्यार्थ्यांसाठी प्रवेशाची अंतिम मुदत १२ मार्च ते २० मार्च २०२६ पर्यंत राहील. अधिक माहितीसाठी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण अमरावती, सामाजिक न्याय भवन, पोलीस आयुक्तालयाचे मागे, चांदुर रेल्वे रोड, अमरावती, तसेच ई-मेल dobbwo amravati @gmail.com यावर संपर्क साधावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याणच्या सहायक संचालक सरीता बोबडे यांनी केले आहे.

# मेळघाटातील रायपूर गावात दुहेरी कोंडी

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

♦ व्याघ्र प्रकल्पामुळे वीज येईना ढगाळ वातावरणात सौर उर्जा ठरतेय कुचकामी

**धारणी:** सातपुड्याच्या कुशीत घनदाट जंगलांनी वेढलेल्या चिखलदरा तालुक्यातील रायपूर या अतिदुर्गम आणि निसर्गरम्य गावात आजही विकासाचा प्रकाश पोहोचलेला नाही. सुमारे तेराशे लोकसंख्या असलेल्या या गावात विजेचा कायमस्वरूपी पुरवठा नाही. सात-आठ वर्षांपूर्वी बसवलेली सौर ऊर्जा पावसाळ्यात निष्प्रभ ठरते. आभाळ दाटलं की वीज जाते. वीज गेली की पाणीपुरवठा थांबतो, अशी भीषण परिस्थिती ग्रामस्थांवर ओढावली आहे. या गावात घरटी दुमदार होत आहेत. परिसरातील जंगलासह ग्रामस्थांची शेती देखील हिरवीगार आहे. मात्र, वीज नसल्यानं शेतीवर कधीही संकट कोसळू शकतं. वीज नसल्यानं गाव विकासापासूनदेखील लांबच आहे.

अमरावती ते धारणी मार्गावर अमरावतीपासून ११० किलोमीटर अंतरावर असणाऱ्या सेमाडोह या गावापासून उंच पहाडावर सुमारे १४ किलोमीटर अंतरावर रायपूर हे गाव घनदाट जंगलात वसलं आहे. या गावात बाहेरील व्यक्तींना जाण्याकरिता वनविभागाच्या कुवापाटी चेक पोस्टवर परवानगी घ्यावी लागते. नोंदणी केल्यावर आणि परवानगी मिळाल्यावरच समोर गावाच्या दिशेनं जाता येतं. गावाच्या वेशीवर असणाऱ्या ग्रामस्थांच्या शेतात सर्वत्र सोलर प्लेट लावलेल्या दिसतात. गावात पोहोचताच सुरुवातीला वनविभागाच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांची वसाहत असून तिथून समोर एक किलोमीटर अंतरावर रायपूर हे आदिवासी समुदायाचं गाव वसलं आहे. या गावात प्रत्येक घराच्या छपरावर सोलर प्लेट लागलेली दिसते. गावात बीज नसल्याने सौर ऊर्जा हेच प्रकाश व्यवस्थेचा एकमेव पर्याय आहे. घरात दोन दिवे आणि टीव्ही या सौर ऊर्जेमुळे सुरू होतो. गावातील तीन-चार छोट्या चौकाच्या ठिकाणी सौरऊर्जेवरच खांबांवरचे दिवे देखील लागतात. गावात पाण्याची टाकी आहे. या टाकीमध्ये गावापासून खाली दीड दोन किलोमीटर अंतरावर असणाऱ्या एका विहिरीतून पाण्याचा पुरवठा होतो. हे पाणीदेखील सौर ऊर्जेद्वारेच टाकीत पोहोचतं.

पिण्यासाठी शुद्ध आणि ताजं पाणी लागतं. आता दोन दिवसांपासून सौरऊर्जा काही काम करत नाही. त्यामुळे आमच्या गावातील नळांना पाणी आलं नाही. दुर्दैवानं आम्हाला शिळं पाणी प्यावं लागतं. गावाच्या खाली लांब विहीर आहे. मात्र, लहान मुलांना घरी एकटा सोडून विहिरीवर पाणी भरायला जाण्याची हिंमत होत नाही. आमच्या नशिबी खरंच खूप त्रास आहे असं रायपूर येथील रहिवासी सुमार्ती धिकार यांनी सांगितलं.

सौरऊर्जेची व्यवस्था गावात असणं म्हणजे सगळं काही व्यवस्थित आणि छान आहे, असं अजिबात होत नाही. आता दोन दिवसांपासून ढगाळ वातावरण असल्यामुळे ही सौर ऊर्जा पूर्णतः ठप्प पडली आहे. गावातील पाणी टाकी रिकामी आहे.

सिटी न्यूज अकोला

गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

## सत्तरीपुढील रूग्णांसाठी 'वय वंदना कार्ड' जिल्ह्यात गावोगाव मोहिम राबविणार

**अकोला:** प्रधानमंत्री जनआरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजनेअंतर्गत ७० वर्षांपुढील व्यक्तींसाठी 'वय वंदना कार्ड' मोहिम जिल्ह्यात हाती घेण्यात आली आहे. त्याचा लाभ घेण्यासाठी संबंधित नागरिकांनी जिल्ह्यात सेतू केंद्रे किंवा आपल्या गावातील आशासेविकांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वयाची ७० वर्ष पूर्ण झालेल्या किंवा त्यावरील वयाच्या व्यक्तींना या योजनेचा लाभ मिळणार आहे. वय वंदना कार्डधारकांना अंगीकृत रूग्णालयात ५ लाख रू. चे वार्षिक उपचार विनामूल्य घेता येतात. आयुष्मान कार्डधारकांना ५ लाख रू. प्रतिकुटुंब प्रतिवर्ष विनामूल्य उपचार मिळतो. तथापि, गंभीर आजारांच्या ज्येष्ठ नागरिकांना वेळोवेळी उपचारांची गरज भासू शकते. अशा ७० वर्षांवरील लाभार्थ्यांना वय वंदना कार्डद्वारे अतिरिक्त उपचार घेता येतात. आयुष्यमान कार्डधारक वय ७० च्या पुढे गेल्यास त्यांना आशासेविकांच्या मदतीने कार्ड अपडेट करता येईल.

## अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांसाठी जागतिक शिक्षणाचे दरवाजे उघडणार

**अकोला:** अनुसूचित जमाती प्रवर्गातील मुला-मुलींना परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेण्याची संधी मिळावी आणि त्यांच्या गुणवत्तेला जागतिक स्तरावर वाव मिळावा, यासाठी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाकडून 'परदेशात शिक्षणासाठी शिष्यवृत्ती' योजना राबवली जात आहे. या योजनेअंतर्गत सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी ४० गुणवंत आदिवासी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ दिला जाणार आहे. इच्छुक आणि पात्र विद्यार्थ्यांकडून ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले आहे. आदिवासी विकास विभागाकडून परदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसूचित जमातीच्या ४० विद्यार्थ्यांना शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाणार आहे.

## जिल्ह्यात ७ ठिकाणी प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रे

**अकोला:** जिल्ह्यातील ७ गावांत प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रे सुरू करण्यात येणार असून, त्यासाठी नवीन दर्जेदार प्रशिक्षण संस्थांची निवड प्रक्रिया सुरू आहे. हातगाव (मुर्तिजापूर), आलेगाव (पातूर) चोहट्टा, मुंडगाव, (अकोट), हिवरखेड, मालेगाव (तेल्हारा) व वाडेगाव (बाळापूर) या ठिकाणी प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्र निर्माण करण्यात येणार आहेत. कौशल्य रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत ग्रामीण भागाकडून शहराकडे होणारे स्थलांतर कमी व्हावे यासाठी ग्रामीण भागात प्रमोद महाजन ग्रामीण कौशल्य विकास केंद्रठ ही योजना राबवली जाते.

## निधन वार्ता

### प्रकाशचंद लोहिया

**अकोला:** येथील केडिया



प्लॉट मधील रहिवासी तथा व्यापारी प्रकाशचंद जगदीशप्रसाद लोहिया यांचे बुधवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात मोठा आप्त परिवार आहे.

# अखेर चिचारी चंदनपूर खारसा रस्त्याचे काम प्रगतीपथावर

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**हिवरखेड:** पंचक्रोशीतील नागरिकांचे श्रद्धास्थान असलेल्या ऋषी महाराज संस्थान धबधबा खाडसा येथे जाणारा रस्ता अत्यंत दुर्गम होता. त्यामुळे सर्व प्रवाशांना रस्त्यावरून ये जा करताना यातना भोगाव्या लागत होत्या. शासनाने हिवरखेड चिचारी, चंदनपुर, बोरव्हा धोंडा आखर रस्त्यासाठी निधी मंजूर केला होता. प्रत्यक्षात वनविभागाच्या बफर झोन मध्ये कॉंक्रीट रस्त्याची परवानगी नसताना दीड वर्षापूर्वीच लोकप्रतिनिधींनी गाजावाजा करून काम सुरू होणे शक्य नसतानाही भूमिपूजन करून निवडणुकीत त्याचे श्रेय लाटले. परंतु दीड वर्ष होऊनही प्रत्यक्षात काम सुरू झाले नव्हते.

यासाठी हिवरखेड परिसरातील पत्रकार, जागरूक नागरिक आणि काही लोकप्रतिनिधींनी,



आवाज बुलंद करून हा विषय चव्हाट्यावर आणला. त्याला सामाजिक कार्यकर्ते रजनीश पोटे यांची साथ मिळाली. त्यांनी वरिष्ठ स्तरावर पाठपुरावा करून कॉंक्रिट ऐवजी डांबरीकरणाचा रस्ता व्हावा यासाठी सातत्याने प्रयत्न केले. वन विभागाच्या परवानग्या मिळाव्या यासाठी मंत्रालय ते वन समिती सोबत पाठपुरावा केला. त्यामुळे रस्त्याचे काम युद्ध स्तरावर सुरू झाले.

हिवरखेड ते धोंडा आखर या जवळपास १५ किलोमीटरच्या रस्त्याचे मजबुतीकरण , खडीकरण, सपाटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. विशेष म्हणजे या रस्त्या व्यतिरिक्त ह्याला असणारे दोन प्रमुख जोडरस्ते जसे की शेतकऱ्यांचे व सर्व धार्मिक नागरिकांचे श्रद्धास्थान म्हणून मान्यता असलेल्या ऋषी महाराज संस्थान धबधबा खाडसा येथे जाणाऱ्या रस्त्यासाठी सामाजिक कार्यकर्ते धिरज बजाज यांच्या शेतापासून ते खाडसा आणि पुढे झरी ते चिचारी या मार्गाला जोडणारा हा २ किमीचा मार्ग त्यामध्ये वाढविण्यात आला. तसेच बोरव्हा या आदिवासी गावाजवळ मुख्य मार्गापासून गावाला जोडणारा छोटासा जोड रस्ता हा सुद्धा वाढविण्यात आला.

आता सध्या स्थितीत सामाजिक कार्यकर्ते धिरज बजाज यांच्या शेतापासून ते खाडसा आणि पुढे झरी ते चिचारी या मार्गाला जोडणारा हा २ किमीचा मार्गाचे डांबरीकरणाचे कार्य पूर्ण झाले आहे. व उर्वरित डांबरीकरणाचे काम सुद्धा युद्ध स्तरावर पूर्ण करण्यात येणार असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले.

या रस्त्यासाठी सातत्याने प्रयत्न करणारे सामाजिक कार्यकर्ते रजनीश पोटे, धीरज बजाज, अर्जुन खिरोडकार यांच्यासह संबंधित लोकप्रतिनिधी, प्रधानमंत्री व मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेचे अधिकारी वानखडे, बोचे, तिरपूडे, कंत्राटदार आणि संबंधितांचे कौतुक होत आहे. सामूहिक प्रयत्नांची फलश्रुती असल्याचे रजनीश पोटे आणि धीरज बजाज यांचे म्हणणे आहे.

## जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे यांचा उमेदवारी अर्ज दाखल

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अकोला:** आकोला-वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचा सन २०२६-२०३१ या कालावधी करीता निवडणूक कार्यक्रम जाहीर झाला आहे. २३.२.२०२६ पासून नामनिर्देशनपत्र दाखल करण्यास सुरूवात झालेली आहे. उमेदवारी अर्ज दाखल करण्याच्या पहिल्याच दिवशी बँकेचे विद्यमान अध्यक्ष डॉ. संतोषकुमार कोरपे यांनी पगारदार



नोकरांच्या पतसंस्था, नागरी सहकारी बँका, ग्रामिण व नागरी सहकारी पत संस्था, ग्रामीण बिगरशेती पतसंस्था मतदारसंघातून आपले नामनिर्देशन पत्र दाखल केले आहे.

वृत्तपत्र प्रतिनिधीशी बोलतांना ते म्हणाले की, सर्वजण माझ्या पॅनलला सहकार्य करतील याची मला खात्री आहे. डॉ. संतोषकुमार कोरपे यांना विचारले की, तुम्हाला निवडणुकीस उभे राहाता येते का? या प्रश्नावर ते म्हणाले अर्थात म्हणूनच उमेदवारी अर्ज दाखल केला आहे.

## डाबकी रोड गेट ते अमानतपूर-टाकोडा मार्ग डांबरीकरण रखडले

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**हातरूण:** डाबकी रोड गेट ते अमानतपूर-टाकोडा रस्त्याच्या डांबरीकरणासाठी निधी मंजूर होऊनही काम सुरू न झाल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. या संदर्भात भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे जिल्हाध्यक्ष एम. के. दिवनाले यांनी काही दिवसांपूर्वी जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभियंत्यांना निवेदन दिले होते.

### उपोषणाचा इशारा

सदर मार्गासाठी मोठ्या प्रमाणात निधी मंजूर झाल्याची माहिती असून दोन वेळा हा रासता पास झालेला आहे तरिहि डांबरीकरणाचे मात्र प्रत्यक्षात आजपर्यंत काम सुरू झालेले नाही. जिल्ह्यात तसेच बाळापूर मतदारसंघातील पदाधिकाऱ्यांमधील राजकीय रस्सीखेचेमुळे काम रखडल्याची चर्चा स्थानिक पातळीवर होत आहे.

व तसेच अकोला जिल्हा व बाळपूर मददारसगं चे खेडे पाड्याचे सर्वमार्गची गंभिर अवस्था झालेली आहेत त्यामुळे

या पार्श्वभूमीवर भ्रष्टाचार निर्मूलन समितीच्या वतीने पुन्हा निवेदन देण्यात आले असून दि. ६ मार्च २०२६ रोजी अकोला येथे धडक मोर्चा काढून उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे. मंगळवारी समितीच्या कार्यकर्त्यांनी आगर, उगवा, हातरुण, लोणाग्रा आदी गावांमध्ये भेटी देऊन नागरिकांना उपोषणात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन केले. मंगळवारी हातरुण ग्रामपंचायत आवारात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

या बैठकीला भ्रष्टाचार निर्मूलन समितीचे अध्यक्ष सुरेश फाळके, सतीश काळणे, पंजाब सिरसाट, हातरुण सरपंच पती सैय्यद काझीम, अनिल गवंडे, शाहरूख पढाण .राजेंद्र काळणे इमीदोद्दीन . यांसह अनेक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.

## उन्हाळ्यापूर्वी पाणवठे उभारण्याची भूमी फाउंडेशनच्या चंचल पितांबरवाले यांची मागणी

वि. प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अकोट :** शहरातील तापमान वाढू लागले असून मुक्या जीवांसाठी पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होण्याची चिन्हे दिसू लागली आहेत. तालुक्यात प्रखर उन्हामुळे मोकाट जनावरे, गाई-गुरे तसेच पक्षी, प्राणी पाण्याअभावी हालअपेष्टा सहन करतात. या पार्श्वभूमीवर भूमी फाउंडेशनच्या अध्यक्ष चंचल पितांबरवाले यांनी नगर परिषद प्रशासनाकडे निवेदनाद्वारे तात्काळ उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

मुख्याधिकारी तसेच पाणीपुरवठा सभापती अमोल पालेकर यांना सादर केलेल्या निवेदनात शहरातील प्रमुख चौक,



बाजारपेठ परिसर, मोकळी मैदाने तसेच प्रत्येक प्रभागात जनावरांसाठी पाणवठे, पाण्याच्या टाक्या व कायमस्वरूपी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्याची ठाम मागणी करण्यात आली आहे.

नगरपरिषदेमधील नव-नियुक्त सदस्यांनी आपल्या वॉर्डमध्ये किमान एक तरी पाणवठा उभारून समाजाप्रती जबाबदारी पार पाडावी. शहरातील अनेक भागांत मोकाट जनावरांना पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे. काही नागरिक घरासमोर पाण्याची भांडी ठेवत असले तरी ती अपुरी पडत आहेत. दरवर्षी तापमानाचा पारा चाळिशी पार करत असताना पाणवठ्यांची कमतरता प्रकर्षाने जाणवत असल्याने प्रशासनाने केवळ आश्वासनांपुरते न राहता ठोस कृती आराखडा तयार करून तातडीने अंमलबजावणी करावी, अशी मागणी जोर धरत आहे.

मानवतेच्या व पर्यावरण संवर्धनाच्या दृष्टीने ही बाब अत्यंत महत्त्वाची असल्याचे नागरिकांचे मत आहे. 'मुक्या जीवांची तहान भागविणे हीच खरी मानवसेवा' असा संदेश देत शहरातील विविध सामाजिक संघटनांनी या मागणीला पाठिंबा दर्शविला आहे. यावेळी अमित गावत्रे, विवेक फरदळे यांच्यासह पशुप्रेमी उपस्थित होते.

## वन्यप्राण्यांचा बंदोबस्त करण्यासाठी कौठकर यांनी घेतली उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची भेट

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अडगाव बु.:** वन्यप्राण्यांमुळे राज्यात शेती पिकांचे दहा हजार कोटी ते चाळीस हजार कोटी पर्यंत नुकसान होते. यामध्ये नीलगाय, रान डुक्कर, हरीण यांचा समावेश आहे. सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या गावात हिंसक वन्यप्राण्यांची दहशत निर्माण झाली आहे. वन विभाग प्राण्यांची काळजी घेतात परंतु मनुष्यावर होणाऱ्या हल्ल्या करिता त्यांच्याकडे ठोस उपाय योजना नाहीत. स्थानिक पातळीवर बरीच आंदोलन करून वन विभाग दुर्लक्ष करीत आहे. या समस्येवर गंभीरपणे विचार होऊन पर्याय निघावा यासाठी शेतकरी संघटनेचे विदर्भ अध्यक्ष लक्ष्मीकांत



कौठकर यांनी उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निवासस्थानी भेट घेतली व निवेदन दिले.

निवेदनात वन्यप्राणी हे वण्याविभाग ची जबाबदारी आहे.प्राण्यांना राखीव क्षेत्र दिलेले आहे. राखीव क्षेत्रात प्राण्यांना अटकाव करण्याकरिता वन्यक्षेत्राला कायमस्वरूपी संरक्षण भीत बांधावी, हिंसक प्राण्यावर तंत्रज्ञान आधारे लक्ष ठेवण्यात यावे. सन१९७२च्या वन्यजीव संरक्षण कायद्यानुसार हिसंक झालेल्या प्राण्याला मारण्याचे अधिकार हे मुख्य वनसंरक्षक अधिकारी यांना आहेत ते अधिकार स्थानिक पातळीवर सरपंचांना द्यावे असे अस न झाल्यास विदर्भ किंवा महाराष्ट्र स्थरावर मोठे आंदोलन करण्याचे ठरवलेले आहे. यावर उपमुख्यमंत्र्यांनी गंभीर दखल घेऊन सकारात्मक भूमिका घेऊन त्यांचे विशेष कार्य अधिकारी संदीप माळवी यांना या विषयावर लक्ष्मीकांत कौठकर यांच्या सोबत तत्काळ चर्चा करून लवकरात लवकर मार्ग काढण्याच्या सूचना दिल्या.

## गजानन महाराज सेवा समितीतर्फे प्रसाद वाटप

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अकोला :** संत गजानन महाराज प्रकट दिन उत्सवाच्या निमित्ताने बिरला कॉलनी गेट क्रमांक एक येथे संत गजानन महाराज सेवा समितीच्या वतीने श्रींचे पूजन व महाआरती करून भक्तांना महाप्रसाद वाटप केले. सकाळी संत गजानन महाराजांचे विधिवत पूजा-अर्चना करण्यात आले. कार्यक्रमात परिसरातील महिला मंडळाने भजने सादर करून भक्तांना अध्यात्मिक आनंद अनुभवायला दिला. विगत



दहा वर्षापासून मंडळ वर्षभर विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करून धर्मसेवा व समाजसेवेचे कार्य करत आहे.

भक्तांनी या पवित्र प्रसंगी उत्साहाने सहभाग घेत आणि महाप्रसाद ग्रहण करून आनंद व्यक्त केला.

## वादातून तरुणावर जीवघेणा हल्ला

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अकोला:** खदान पोलिस ठाण्याच्या हद्दीतील तानाजी चौक परिसरात किरकोळ वादातून एका तरुणावर जीवघेणा हल्ला झाल्याची धक्कादायक घटना घडली. अजय मेश्राम या तरुणाच्या डोक्यावर दोन ते तीन युवकांनी बिअरची बाटली फोडून गंभीर जखमी केल्याची माहिती मिळत

### बिअरच्या बाटलीने डोक्यावर प्रहार

आहे. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

तानाजी चौकात किरकोळ कारणावरून झालेल्या वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी दोन ते तीन युवकांनी अजय मेश्राम याच्या डोक्यावर बिअरची बाटली फोडून त्याच्यावर हल्ला केला. या हल्ल्यात अजय गंभीर जखमी झाला असून त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून पुढील तपास सुरू केला आहे. हल्लेखोरांविरुद्ध कठोर कारवाई करण्याची मागणी स्थानिक नागरिकांकडून केली जात आहे.

## शेतकरी खातेदारांना कर्जासाठी केवायसी करणे आवश्यक

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अकोला:** जिल्ह्यातील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेमार्फत व दि. अकोला - वाशिम जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत घेतलेल्या कर्जाबाबत शेतकऱ्यांनी केवायसी करणे आवश्यक आहे.

जे शेतकरी मयत झाले असतील त्यांच्या वारसांनी विविध सेवा सहकारी संस्था व दि. अकोला- वाशिम जिल्हा मध्यवर्ती बँकेत वारसांची नावे देऊन सर्वांनी त्यांचे आधार कार्ड संबंधीत गटसचिव व बँकेचे शाखाधिकारी यांचेकडे जमा करावेत, असे आवाहन सहकारी संस्थेचे जिल्हा उपनिबंधक डॉ. प्रविण एच लोखंडे यांनी केले आहे.

अकोला तालुक्यातील २५६, अकोटमधील ७८, बार्शिटाकळीतील ३२०, बाळापूरमधील ८१, पातुरमधील १३३, तेल्हारामधील २५३, मुर्तिजापूरमधील ४३७ असे एकूण १ हजार ५५८ खातेदारांचे आधार कार्ड प्रत सोसायट्यांकडे उपलब्ध नाहीत.

राज्यातील शेती क्षेत्रात आणि शेतकऱ्यांच्या जीवनात आमुलाग्र बदल घडवून शेतकऱ्यांची थकीत, कर्जाच्या विळख्यातुन सोडवणूक करण्यासाठी आपत्कालीन व दीर्घकालिन उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने शेती कर्जाची माहिती पोर्टलवर भरण्याबाबत शासनाचे युध्द पातळीवर कामकाज सुरु आहे. ही माहिती शासनाने पोर्टलवर भरण्यासाठी सर्व थकबाकीदार शेतकऱ्यांचे केवायसी करणे आवश्यक असल्यामुळे त्यांचे आधार नंबर आवश्यक आहेत. तरी विविध कार्यकारी सेवा सहकारी सोसायट्या व बँकेकडे बहुतांश शेतकऱ्यांचे आधार कार्ड उपलब्ध नाहीत. त्यामुळे तत्काळ केवायसी पूर्तता करण्याचे आवाहन जिल्हा उपनिबंधक डॉ. प्रवीण लोखंडे यांनी केले आहे.

## मृत्यूनंतर कर्मकांडास फाटा; पर्यावरणपूरक अंत्यसंस्काराचा पुंड्यात आदर्श

वि. प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अकोट:** मृत्यू अटळ असून तोच अंतिम सत्य आहे; मात्र मृत्यूनंतर होणारी अवास्तव कर्मकांडे टाळणे ही काळाची गरज आहे,ङ्ग असा संदेश देत पुंडा येथे एका कुटुंबाने पर्यावरणपूरक आणि वैज्ञानिक दृष्टिकोनातून अंत्यसंस्कार करून समाजासमोर आदर्श निर्माण केला आहे.

पुंडा येथील प्रतिभा साहित्य संघाचे संस्थापक अध्यक्ष व वैदर्भीय कवी विठ्ठलराव कुलट यांचे वडील स्व. रामभाऊ सुर्यभान कुलट यांच्या निधनानंतर पारंपरिक पद्धतीऐवजी पर्यायी निर्णय घेण्यात आला. प्रेताची राख व अस्थी नदीत विसर्जित न करता शेतात खोल खड्डा खोदून पुरण्यात आल्या. त्या ठिकाणी येत्या पावसाळ्यात फलवृक्ष लागवड करण्याचा संकल्प कुटुंबीयांनी केला आहे.

नदीप्रदूषणाचा वाढता प्रश्न लक्षात घेऊन हा निर्णय घेण्यात आल्याचे कुटुंबीयांनी सांगितले.



अस्थी व राख नदीत विसर्जित केल्याने पाण्याचे प्रदूषण वाढते व पर्यावरणास हानी पोहोचते, याची जाणीव ठेवून पर्यावरणपूरक पर्याय स्वीकारण्यात आला.

प्रेतयात्रेत मुली, सुना आणि मुलांनी खांदा देत समानतेचा संदेश दिला. सर्वांनी मिळून मुखाग्नी दिला. देवाज्ञा ते तेरवी या कालावधीत घरी संत तुकाराम महाराज यांच्या गाथेतील प्रबोधनात्मक अभंगांचे वाचन व श्रवण करण्यात आले. सुतक पाळणे, दाढी वाढवणे, डोक्याचे केस काढणे, पिंडदान, कावळ्यांची वाट पाहणे, नदीत बुड्या मारणे आदी पारंपरिक कर्मकांडे टाळण्यात आली. दशक्रिया विधी महिलांच्या पुढाकाराने वैज्ञानिक दृष्टिकोनातून पार पडला.

तेरवीच्या कार्यक्रमावरील अनावश्यक खर्च टाळून तो निधी समाजोपयोगी कार्यासाठी देण्याचा संकल्पही करण्यात आला आहे. यापूर्वी पाच वर्षांपूर्वी स्व. चंद्रप्रभा रामभाऊ कुलट यांच्या निधनानंतर स्मृतिप्रीत्यर्थ पुंडा येथे प्रवेशद्वार उभारण्यात आले होते.

पर्यावरण संवर्धन, स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक जाणीव यांचा संगम घडविणारा हा उपक्रम परिसरात चर्चेचा विषय ठरला असून, अशा परिवर्तनवादी निर्णयांची आज समाजाला नितांत गरज असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६ https://epaper.citynewssuperfast.com

# बनावट दारू निर्मिती कारखाण्याचा पर्दाफाश

## राज्य उत्पादन शुल्क विभागाची धाड; मुख्यसुत्रधार कुटुंबासह फरार

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी





**यवतमाळ :** वणी शहरालगत लालगुडा परिसरात एका दुमजली घरात सुरू असलेला बनावट देशी दारू निर्मितीचा कारखाना उघडकीस आला आहे. राज्य उत्पादन शुल्क विभाग यांच्या पथकाने टाकलेल्या धाडीत मोठ्या प्रमाणात तयार दारूच्या बाटल्या आणि निर्मितीसाठी लागणारे साहित्य जप्त करण्यात आले. अवैध आणि नकली दारूविरोधातील ही अलीकडील काळातील महत्त्वाची कारवाई मानली जात आहे.

उत्पादन शुल्क विभागाला मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार बुधवारी (२५ फेब्रुवारी) दुपारी स्मशानभूमीजवळील एका दुमजली घरावर छापा टाकण्यात आला. घरातील लाकडी दिवाण व आलमारीत लपवून ठेवलेल्या ९९ मिलीच्या देशी दारूच्या ३६ प्लास्टिक बाटल्या आढळून आल्या. या बाटल्यांवर 'रुपेश संत्रा' ब्रँडचे बनावट स्टिकर्स लावण्यात आले होते. पिशव्यांमध्ये सुमारे ३,००० 'निप' साठवून ठेवण्यात आल्याचे आढळले. जप्त दारूची अंदाजे किंमत १ लाख ६२ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले. घराला लागून असलेल्या टिनाच्या शेडमधून रिकाम्या बाटल्या, झाकणं, काचेच्या बाटल्या, प्लास्टिक ड्रम तसेच दोन दुचाकी आणि एक मोपेड असा एकूण सुमारे २ लाख ७३ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

छाप्यादरम्यान घरातील लाकडी दिवाणात लपून बसलेल्या एका युवकाला ताब्यात घेण्यात आले. चौकशीत हा बनावट दारू कारखाना श्याम भरत मेश्राम यांचा असल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी सूरज लोडे (रा. वेळाबाई) याला अटक केली. तरमुख्य आरोपी शाम मेश्राम हा कुटुंबासह फरार झाला आहे. या प्रकरणी पुढील तपास सुरू असून अवैध दारू निर्मितीच्या साखळीचा छडा लावण्याचे प्रयत्न सुरू असल्याची माहिती उत्पादन शुल्क विभागाने दिली.

# दोन खासदार, पण संघटना वाऱ्यावर; महागाव-उमरखेडमध्ये कार्यकर्ते 'जय महाराष्ट्र' करणार!

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**वसंत देशमुख**

**उमरखेड :** यवतमाळ जिल्ह्यातील राजकारणात सध्या मोठी खळबळ उडाली असून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात अंतर्गत अस्वस्थता शिगेला पोहोचल्याची चर्चा आहे. जिल्ह्याला यवतमाळ-वाशिमचे खासदार संजय देशमुख आणि हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर असे दोन प्रतिनिधी लाभले असतानाही संघटनात्मक पातळीवर नाराजीचा सूर उमटत आहे.

निवडणुकीनंतर खासदारांनी स्थानिक संघटनेकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप पक्षातीलच काही पदाधिकाऱ्यांकडून होत आहे. महागाव आणि उमरखेड विधानसभा मतदारसंघातील निष्ठावंत कार्यकर्त्यांना निर्णय प्रक्रियेत स्थान दिले जात नसल्याची भावना बळावत चालली आहे. अनेक वर्षे पक्षासाठी झटणाऱ्या शिवसैनिकांना बाजूला ठेवले जात असल्याची खंत उघडपणे व्यक्त होऊ लागली आहे.

महागाव तालुका हा ठाकरे सेनेचा बालेकिल्ला मानला जातो. शिवसेना, युवासेना, महिला आघाडी, शेतकरी आघाडी आणि विद्यार्थी सेनेचे पदाधिकारी येथे सक्रिय राहिले आहेत. मात्र अलीकडच्या काळात संघटनात्मक बैठकांचा अभाव, स्थानिक प्रश्नांकडे दुर्लक्ष आणि संवादाचा तुटलेला धागा यामुळे असंतोष वाढला आहे. परिस्थिती लवकर सुरळीत न झाल्यास महागाव-उमरखेडमधील अनेक पदाधिकारी प्राथमिक सदस्यत्वासह राजीनाम्याचा निर्णय जाहीर करू शकतात. 'जय महाराष्ट्र' करत बाहेर पडण्याची भूमिका काहींनी आंतरिक बैठकीत मांडल्याचे समजते. दोन खासदार असूनही संघटना सैलावत चालल्याची चर्चा रंगत असताना, हा असंतोष थांबवण्यात पक्ष नेतृत्व कितपत यशस्वी ठरणार, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे. विदर्भातील ठाकरे सेनेसाठी ही आगामी काळातील मोठी कसोटी ठरण्याची चिन्हे दिसत आहेत.

# राष्ट्रीय सेवा योजना जीवन घडविते – अण्णासाहेब देशमुख पारवेकर

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी



**पारवा :** "विद्यार्थी हा भारताचा आधारस्तंभ आहे. जर त्याला योग्य दिशा दाखविली तर हाच युवक भारताला जागतिक स्तरावर नेऊ शकतो. राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थ्यांमध्ये समाजसेवा, नेतृत्व गुण, संघटन कौशल्य आणि विनयशीलता विकसित करते असे प्रतिपादन अण्णासाहेब देशमुख पारवेकर यांनी केले.

बाबासाहेब देशमुख पारवेकर महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या श्रमसंस्कार शिबिराचे उद्घाटन नुकतेच तरोडा पोड येथे पार पडले. या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्षस्थानी अण्णासाहेब देशमुख पारवेकर, तर उद्घाटक डॉ. संजय गाढवे उपस्थित होते. पारवा शिक्षण संस्थेचे संचालक सचिन पारवेकर, सुहास पारवेकर, प्रा. मंगेश होटे, सुनील ठाकरे, मोरेश्वर सरोदे यांच्यासह महाविद्यालयातील अनेक मान्यवर उपस्थित होते.

कर्मयोगी गाडगेबाबा यांच्या १५०व्या जयंती दिनानिमित्त २२ फेब्रुवारी २०२६ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान शिबिराचे आयोजन करण्यात आले. उद्घाटक डॉ. संजय गाढवे म्हणाले, "राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून विद्यार्थी समाजातील सुख-दुःखांना जवळून पाहतो. त्यामुळे त्याला आयुष्यात येणाऱ्या यश-अपयशांना सहज सामोरे जावे लागते. जीवन अधिक सुखकर आणि बळकट बनविता येते." कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे सरपंच योगिता कुळसंगे, उपसरपंच सोमेश्वर नगनूरवार, राजेंद्र गोमासे, घाटंजी गटशिक्षण अधिकारी प्रज्ञा पाटील, प्राचार्य डॉ. धर्मेंद्र तेलगोटे उपस्थित होते. विद्यापीठ गीताच्या माध्यमातून सुरुवात झालेल्या कार्यक्रमात गजानन रेड्डीवार, वसंतराव कोवे, प्रल्हादराव निकम, गणपतराव कन्नलवार, सुरेश पेटकुले, संदीप कडू, नारायण रेडीवार, रामदास राजूरकर, प्रकाश शेंडे, भीमरावजी आत्राम, सोनवणे तलाठी, देवरावजी सोयाम, गणेश राऊत, गजानन उत्तरवार, अनिल मडावी, ग्रामसेवक राजेश माहुरे, विशाल साबापुरे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीलाच बी.ए.भाग २ च्या विद्यार्थिनी कु. नंदिनी गुरुनुले, अनुजा प्रधान, दुर्गा शेंडे, अश्वीनी पेटकुले यांनी स्वागतगीत सादर केले. प्राचार्य डॉ. धर्मेंद्र तेलगोटे यांनी विद्यार्थ्यांना समाजसेवेचे आवाहन करत राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. गजानन लोहवे, प्रास्ताविक प्रा. डॉ. जगदीश हेंडवे, आभार प्रदर्शन प्रा. डॉ. संदीप अग्रवाल यांनी केले. यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. संदीप देसाई, डॉ. लक्ष्मण यादव, डॉ. अभय चांदेकर, अजय पांचाळ, अरविंद जिड्डीवार, दिलीप इंगोले, राजू नगनुरवार, राहुल आडे, स्वामी गज्जलवार यांनी परिश्रम घेतले. शिबिरात बी.ए.भाग १, २, ३ चे विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# जिल्हा वार्षिक योजनेसाठी ५७० कोटींची मंजुरी

## ९८ कोटींची अतिरिक्त वाढ; विकासकामांना गती

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी



**यवतमाळ :** जिल्ह्याच्या विकासाला चालना देणारा महत्त्वपूर्ण निर्णय घेत राज्य शासनाने सर्वसाधारण जिल्हा वार्षिक योजनेसाठी ५७० कोटी रुपयांची अंतिम तरतूद मंजूर केली आहे. ही मंजुरी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत देण्यात आली. कमाल आर्थिक मर्यादेपेक्षा ९८ कोटी ४२ लाख रुपयांची अतिरिक्त वाढ मान्य करण्यात आली आहे.

नोव्हेंबर २०२५ मध्ये जिल्हास ४७१ कोटी ५८ लाख रुपयांची कमाल आर्थिक मर्यादा प्राप्त झाली होती. त्यानुसार प्रारूप आराखडा तयार करून ५ फेब्रुवारी रोजी जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. त्यानंतर ११ फेब्रुवारीला झालेल्या राज्यस्तरीय बैठकीत पालकमंत्री संजय राठोड आणि जिल्हाधिकारी विकास मीना यांनी १७५ कोटी रुपयांच्या अतिरिक्त निधीची मागणी मांडली होती. त्यापैकी ९८ कोटी ४२ लाख रुपयांची वाढ मंजूर करण्यात आली.

मंजूर तरतुदीनुसार गाभा क्षेत्रासाठी ३७३ कोटी १० लाख रुपये, बिगरगाभा क्षेत्रासाठी १७० कोटी ४ लाख रुपये तर इतर क्षेत्रासाठी ५ टक्के म्हणजे २६ कोटी ८४ लाख रुपये राखीव ठेवण्यात आले आहेत.

इतर क्षेत्रात नाविन्यपूर्ण उपक्रमांसाठी ३.५ टक्के (१८ कोटी ७९ लाख), शाश्वत विकास ध्येयांसाठी १ टक्का (५ कोटी ३६ लाख) आणि मूल्यमापन व संनियंत्रणासाठी २ कोटी ६८ लाख रुपये अशी एकूण ५७० कोटींची तरतूद करण्यात आली आहे.

शासनाच्या निर्देशानुसार शालेय शिक्षण विभागासाठी किमान ५ टक्के, महिला व बाल विकासासाठी ३ टक्के, संरक्षित गड-किल्ले व मंदिरे यांसाठी ३ टक्के, गृह (पोलीस व तुरुंग) विभागासाठी ३ टक्के, महसूल विभागासाठी कमाल ५ टक्के, दिव्यांग कल्याणासाठी १ टक्का आणि क्रीडा विभागासाठी १ टक्का निधी राखीव ठेवण्यात आला आहे. नागरी भागांतील मूलभूत सोयींसाठी ३३ कोटी २ लाख रुपयांची विशेष तरतूद करण्यात आली आहे.

आकांक्षित तालुका कार्यक्रमांतर्गत पुसद व झरीजामणी तालुक्यांसाठी प्रत्येकी ५ कोटी रुपयांप्रमाणे एकूण १० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे मागास भागांतील पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य आणि विविध विकास प्रकल्पांना गती मिळणार आहे.

वाढीव निधीमुळे शिक्षण, महिला व बालकल्याण, महसूल, दिव्यांग कल्याण, क्रीडा आणि नागरी सुविधा या क्षेत्रांमध्ये विकासकामांना वेग मिळून जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीला नवी दिशा मिळणार आहे.

# सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योगांना प्रशिक्षण

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**यवतमाळ :** जिल्ह्यात आर्थिक समावेशन आणि सूक्ष्म, लघु व मध्यम उद्योग (एमएसएमई) विकासाला चालना देण्यासाठी भारतीय रिझर्व्ह बँक, नागपूर कार्यालयातर्फे २३ फेब्रुवारी रोजी 'विदर्भ स्पेसिफिक ट्रेनिंग फॉर एम्पॉवरिंग एमएसएमई' आणि विशेष टाऊनहॉल बैठकीचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमात जिल्ह्यातील २०० हून अधिक एमएसएमई उद्योजक आणि तरुण इच्छुकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. या कार्यक्रमाला बँक ऑफ इंडियाचे उप महाव्यवस्थापक कुश गहोत्रा, सुनील पांडे, सुशील गरूड तसेच सिडबी, नाबार्ड आणि इतर प्रमुख बँकांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

# बोलेरोच्या धडकेत सायकलस्वार ठार

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी



**उमरखेड :** भरधाव बोलेरो वाहनाने सायकलला धडक दिली. या अपघातात दूध विक्रेता ठार झाला. ही घटना नागपूर–तुळजापूर राष्ट्रीय महामार्गावरील अमानपूर फाट्याजवळ बुधवारी २५ फेब्रुवारी रोजी सकाळी आठ वाजताच्या सुमारास घडली.

राजू रामधन राठोड (वय ४५) रा. सुकळी जहागीर असे मृतकाचे नाव आहे. राठोड हे रोजप्रमाणे सायकलने दूध घेण्यासाठी सुकळी जहागीरहून अमानपूरकडे जात असताना, एमएच ०९ एफएल ६०६६ क्रमांकाच्या भरधाव बोलेरो पिकअपने त्यांना पाठीमागून जोरदार धडक दिली. धडकेची तीव्रता एवढी होती की ते गंभीर जखमी झाले. स्थानिकांनी तातडीने मदत करून त्यांना उमरखेड येथील शासकीय उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले; मात्र वैद्यकीय तपासणीनंतर त्यांना मृत घोषित करण्यात आले.

या घटनेने सुकळी जहागीर परिसरात शोककळा पसरली असून, मृतकाच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. दरम्यान, उमरखेड पोलीस ठाण्यात बोलेरो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास सुरू आहे.

# शिवरामजी मोघे महाविद्यालयात जनजागृती


प्रतिनिधी २६ फेब्रुवारी



**पांढरकवडा :** शिवरामजी मोघे महाविद्यालयात विद्यार्थिनींच्या आरोग्यासाठी सॅनिटरी नॅपकिन्सच्या महत्त्वाविषयी जनजागृती आणि मोफत वितरण कार्यक्रमाचे आयोजन केले होते. हा उपक्रम महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अजय सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आला. महिला तक्रार निवारण समिती (ICC) च्या अध्यक्षा डॉ. सुजाता शेंडे यांच्या पुढाकाराने कार्यक्रम राबविण्यात आला. प्रारंभी डॉ. सुजाता शेंडे यांनी प्रास्ताविक करताना मासिक पाळी दरम्यान स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी सांगितले की, "सॅनिटरी नॅपकिन्सचा योग्य वापर केल्यास संसर्गजन्य आजारांपासून संरक्षण मिळते, आरोग्य टिकते तसेच मासिक पाळीबाबत असलेले गैरसमज आणि सामाजिक संकोच दूर होतात. विद्यार्थिनींनी आरोग्याबाबत जागरूक राहून सुरक्षित व स्वच्छ पद्धतींचा अवलंब करावा." कार्यक्रमास प्राध्यापिका डॉ. एकता मेनकुदळे, डॉ. उषा राखुंडे, प्रो. प्रगती टाले यांनी उपस्थिती लाभली आणि विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. बी.एस्सी., बी.ए. व बी.कॉम. प्रथम, द्वितीय आणि तृतीय वर्षातील विद्यार्थिनींनी कार्यक्रमात उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व विद्यार्थिनींना मोफत सॅनिटरी नॅपकिन्सचे वितरण करण्यात आले. महिलांच्या आरोग्य आणि सक्षमीकरणासाठी महाविद्यालयाने राबविलेला हा उपक्रम विद्यार्थिनींसाठी अत्यंत उपयुक्त आणि प्रेरणादायी ठरला.

# कर्मयोगी संत गाडगेबाबा जयंतीनिमित्य अंधश्रध्दा निर्मूलन कार्यक्रम

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी



**यवतमाळ :** आधुनिक भारतात जरी विज्ञान आणि प्रगतीची वारे वाहत असली तरी समाजात अजूनही अंधश्रध्दा, जादूटोणा आणि भोंदूबाबांची चंगळ दिसून येते. यावर जागरूकता निर्माण करण्यासाठी, कर्मयोगी संत गाडगेबाबा जयंतीच्या निमित्ताने सजल रेसिडन्सी, अंबिका नगर, यवतमाळ येथे अंधश्रध्दा निर्मूलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून रुपेश वानखडे (जिल्हा कार्याध्यक्ष, अंधश्रध्दा निर्मूलन समिती, यवतमाळ), निलध्वज कांबळे (जिल्हा सचिव, अंधश्रध्दा निर्मूलन समिती, यवतमाळ) उपस्थित होते. यावेळी भोंदूबाबांच्या आणि जादूटोण्याच्या विश्वासावर कसे लोक फसवले जातात याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिके करून दाखविण्यात आली. यामध्ये नारळाला आग लावणे, खिळ्यावर झोपणे, हातातून सोन्याची चैन काढणे आणि भूत-प्रेतांसंबंधीचे प्रकार अशा अनेक प्रयोगांचा समावेश होता. त्याचबरोबर, "माझी वसुंधरा अभियान ५.०" अंतर्गत देवळी नगर परिषदेला १ कोटी ७५ लाख रुपयांचे पारीतोषिक मिळवून देण्यात आले, त्यासाठी इंजि. संदीप गायकवाड यांच्या अथक परिश्रमाचा विशेष उल्लेख करण्यात आला. या अभूतपूर्व यशाबद्दल त्यांचा शालफळ व पुष्पगुच्छ देऊन नागरी सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पंकजा मुंडे यांच्या हस्ते मुंबईत त्यांना हे बक्षिस वितरण करण्यात आले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन सुरेंद्र वाकोडे यांनी केले. यशस्वीतेसाठी सुशिल ताकसांडे, सुनील गजघाटे, संदीप गायकवाड, अमोल लढे, अनिल महल्ले, सिध्दार्थ बनसोड, पंडीत घायवन, प्रशांत पाटील, बंटी वाघमारे, सिध्दार्थ मोटघरे, व अन्य अनेक कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले. यावेळी साधना शंभरकर (नगरसेविका), समाधान जोगदंड, निलेश वाघमारे, राजु लामसोंगे, अनिल बनसोड, मंगला कांबळे, रुपेश गायकवाड, आशिष कापशिकर, विनोद वानखेडे, अमित डोंगरे, देवा कांबळे, विरेंद्र लांजेवार, गिरिधर भगत, अशोक फुल्लके, राहूल दातार, चरणदास बांगर, घनश्याम पाटील, उज्वला चंदनखेडे, वंदना वनकर, नंदू काथोटे, मनोज दातार, पंडीत कांबळे, हेमचंद वाघमारे, देवा बारसागडे, अर्जुन मेश्राम, प्रतिभा महल्ले, नेहा गायकवाड, निरंजन मेश्राम, स्नेहल मानकर, वैशाली गजघाटे, लक्ष्मण वडे, वेणू तामगाडगे, अंजली वाकोडे, सेनापती लभाणे, प्रितम डोंगरे, सुषमा रामटेके, रुपेश मेश्राम, सुरज सुटे, सदानंद लढे, चंदू नंदागवळी उपस्थित होते.

# 'शिवतीर्थाचा विकास करणे हे माझ कर्तव्य'

## ना. प्रा. डॉ. अशोक उईके यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी



**राळेगाव :** "माझ्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांचा देखणा अश्वारूढ पुतळा व स्मारक उभा आहे, हा अभिमानाचा विषय आहे. शिवतीर्थाचा विकास करणे हे माझे कर्तव्य आहे आणि मी सदैव प्रामाणिकपणे जनसेवा करण्याचा संकल्प करतो." असे प्रतिपादन नामदार प्रा. डॉ. अशोक उईके यांनी केले.

छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्सव समितीच्या वतीने राळेगाव येथे तीन दिवसीय छत्रपती महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला. या महोत्सवात विविध वक्तृत्व स्पर्धा, सामाजिक प्रबोधन, किल्ले स्पर्धा, शालेय व महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा, रक्तदान शिबिर आणि दिंडी स्पर्धा यांचा समावेश होता.

महोत्सवाचे उद्घाटन राळेगाव नगरपरिषदेसह नगराध्यक्ष रविंद्र शेराम, उपनगराध्यक्ष जानराव गिरी, कॉंग्रेस शहराध्यक्ष प्रदीप ठूने, डॉ. संतोष कोकूलवार, बाळू धुमाळ आणि नगरसेवक व नगरसेविका यांच्या उपस्थितीत करण्यात आले.

शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी आयोजित वक्तृत्व स्पर्धेत: प्रथम क्रमांक: तनुश्री बुचके, द्वितीय क्रमांक: स्नेहल शेंडे, तृतीय क्रमांक: प्रतिक दारव्हेकर, किल्ले स्पर्धेत: प्रथम क्रमांक: वैदेही तुटुरकर, द्वितीय क्रमांक: प्रथमेश झाडे, तृतीय क्रमांक: अवंती कांबळे, सांस्कृतिक स्पर्धेत : प्रथम क्रमांक: तन्वेस्ट झाडे व ग्रुप, द्वितीय क्रमांक: प्रश्विता चांदोरे व ग्रुप, तृतीय क्रमांक: संचिता दुर्गे व ग्रुप, चतुर्थ क्रमांक: यशस्वी बेंदूर, खोली सांस्कृतिक स्पर्धेत: प्रथम क्रमांक: राम पंचभाई व ग्रुप, द्वितीय क्रमांक: न्यू इंग्लिश हायस्कूल, तृतीय क्रमांक: ग्रुप राळेगाव. १९ फेब्रुवारीला छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याचे पूजन करण्यात आले, तर सायंकाळी भव्य शोभायात्रा आणि दिंडी स्पर्धा आयोजित करण्यात आली. या दिंडी स्पर्धेत सहभागी मंडळांमध्ये संत ज्ञानेश्वर महाराज मंडळ, काचनगाव, संत तुकाराम महाराज मंडळ, वाढवणाबाजार, साईबाबा मंडळ, जळका, जय हनुमान मंडळ, कोपरी, शिव भजन मंडळ, राळेगाव, इत्यादींचा समावेश होता.

महोत्सवाचे अध्यक्ष नामदार प्रा. डॉ. अशोक उईके म्हणाले, "माझ्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांचा देखणा अश्वारूढ पुतळा व स्मारक उभा आहे, हा अभिमानाचा विषय आहे. शिवतीर्थाचा विकास करणे हे माझे कर्तव्य आहे आणि मी सदैव प्रामाणिकपणे जनसेवा करण्याचा संकल्प करतो."

कार्यक्रमाच्या यशासाठी समितीचे सर्व सदस्य, एडवोकेट प्रियदर्शन अशोक कोळी, एडवोकेट प्रफुल चव्हाण, इंजि. संदीप गायकवाड, तसेच सर्व दात्यांनी व सहयोगकांनी परिश्रम घेतले. संपूर्ण तीन दिवस महोत्सवात राळेगावकरांचा उत्स्फूर्त सहभाग पाहायला मिळाला.

# आ.मांगुळकरांनी धरले सरकारला धारेवर

## अर्थसंकल्पीय अधिवेशन; सोयाबीनला हेक्टरी २० हजार बोनसची मागणी

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी



**यवतमाळ :** जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वाढत्या अडचणींवर आमदार अनिल उर्फ बाळासाहेब मांगुळकर यांनी राज्य विधिमंडळात जोरदार आवाज उठवला. आत्महत्याग्रस्त ३८ शेतकरी कुटुंबांना अद्याप मदत न मिळणे, अवकाळी पावसाने झालेली पिकांची हानी आणि रात्रीच्या वीजपुरवठ्यामुळे होत असलेले अपघाती मृत्यू या मुद्द्यांवर त्यांनी सरकारला धारेवर धरले.

राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तिसऱ्या दिवशी त्यांनी लक्षवेधीद्वारे जिल्ह्यातील परिस्थिती मांडली. जानेवारी व फेब्रुवारी या दोन महिन्यांत ३८ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बाब गंभीर असून, संबंधित कुटुंबांना तातडीने आर्थिक मदत देण्यात यावी, अशी मागणी त्यांनी केली. नुकत्याच झालेल्या अवकाळी पावसामुळे गहू, हरभरा आणि ऊस ही पिके आडवी झाल्याचे सांगत त्वरित पंचनामे करून नुकसानभरपाई जाहीर करण्याची मागणीही त्यांनी लावून धरली. रात्रीच्या वीजपुरवठ्यामुळे साप-विंचवांच्या दंशाने शेतकऱ्यांचे मृत्यू होत असल्याचा मुद्दा उपस्थित करत "शेतकऱ्यांना दिवसा वीज द्या; जीव वाचवा," अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली. सोलर पंपासाठी पैसे भरूनही अनेक शेतकऱ्यांना पंप मिळाले नसल्याची तक्रार करत कापूस व सोयाबीनला योग्य हमीभावासह हेक्टरी २० हजार रुपयांचा बोनस जाहीर करावा, अशी मागणी त्यांनी केली. "घोषणांचा पाऊस नको; माझ्या शेतकऱ्याच्या पदरात मदत पडली पाहिजे," अशा शब्दांत त्यांनी सरकारला इशारा दिला. **प्रमुख मागण्या :** ३८ आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांना तात्काळ मदत, अवकाळीग्रस्त गहू, हरभरा व ऊस पिकांचे त्वरित पंचनामे, शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा, कापूस व सोयाबीनला हेक्टरी २० हजार रुपये बोनस, शेतकरी प्रश्नांवरून अधिवेशनात पुन्हा एकदा यवतमाळचा मुद्दा केंद्रस्थानी आल्याचे चित्र पाहायला मिळाले.

५

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

गुरूवार दि. २६ फेब्रुवारी २०२६

http://epaper.citynewssuperfast.com

# सामाजिक संघटना एकत्र...

## वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगमध्ये...

# बदला दादागिरीच्या ठेकेदारीचे सत्र !

### काहीच कारण नसतांना, सिसीटीव्ही कॅमेरे असतांना, पार्कींगचे पैसे देवूनही त्रास विनाकारण

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

वाशीम रेल्वे स्टेशनच्या आवारात असलेल्या पार्कींगचा ठेका मागील अनेक वर्षापासून एकाच ठेकेदाराला रेल्वे प्रशासन देत असल्याचा धक्कादायक प्रकार निदर्शनास आला आहे. पार्कींगचा ठेकेदार हा वादग्रस्त असून त्याच्या पार्कींग करण्याच्या दादागिरीने वाशीम परिसरातील सर्व वाहनचालक परेशान झाल्याचे समजते. ठेकेदाराच्या दादागिरीला रेल्वेचे अधिकारी आणि रेल्वे पोलीसांचे आर्थिक पाठबळ असल्यामुळेच त्या ठेकेदाराकडून दररोज रेल्वे स्टेशनवर ये-जा करणाऱ्या वाहन चालकांची खुलेआम आर्थिक लूट सुरू असल्याचे वास्तव आहे. त्या वादग्रस्त ठेकेदाराचा पार्कींगचा ठेका कायमस्वरूपी बंद करण्यासाठी विविध सामाजिक संघटना व ग्राहक संघटनांनी पुढाकार घेतला असून एकत्र येणार आहेत. दादगिरीच्या ठेकेदारीचे सत्र बंद करण्यासाठी विविध आंदोलनही करणार आहेत.

वाशीम रेल्वे स्टेशनच्या आवारात मागील काही वर्षापासून दुचाकी, तिनचाकी आणि चारचाकी वाहनांसाठी पार्कींगची सुविधा रेल्वे प्रशासनाने सुरू केली आहे. रेल्वे प्रशासनाने व अनेक वर्षापासून पार्कींगचा ठेका घेणाऱ्या वादग्रस्त ठेकेदाराने वाहनांच्या सुरक्षिततेसाठी टिनशेडची सुविधा सुद्धा उपलब्ध करुन दिली नाही. पार्कींगसाठी शेड नसल्यामुळे वाहन चालकांची दररोज पार्कींगमध्ये ठेवलेली वाहने उन्ह, वारा, पावसाचा त्रास सहन करत असल्याचे चित्र आहे. रेल्वेस्टेशन वर येणाऱ्या रेल्वे गाडीच्या वेळेवर अथवा वेळेच्या अगोदर प्रवाशांना, नातेवाईकांना आणून सोडण्यासाठी अथवा घेण्यासाठी येणाऱ्या आप्तेष्ठांना सुद्धा जबरीने, दादागिरी करून पार्कींगचा वादग्रस्त ठेकेदार वाहने पार्कींगमध्येच लावण्याची सक्ती करून वाहनचालक, मालकांची आर्थिक लूट करत आहे. रेल्वे प्रशासनाच्या अधिकाऱ्यांसमोर व स्टेशनवर ड्युटीवर असलेल्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या






संगनमतानेच वादग्रस्त ठेकेदाराची अरेरावी व दादागिरी खुलेआम सुरू असल्याची माहिती सूत्रांकडून प्राप्त झाली आहे. रेल्वे पार्कींगचा ठेकेदार असलेल्या ठाकूरची गुन्हेगारीची पार्श्वभूमी असल्याची चर्चा आहे. पार्कींगचा ठेका घेण्याअगोदर ठाकूर ने रेल्वे आवाराच्या गेटला लागून असलेल्या एका गरीब व्यक्तीच्या जागेवर अतिक्रमण केले होते. त्या गरीब माणसाची जागा सोडण्यासाठी ठाकूरने दादागिरी करून त्या गरीब माणसाला खूप त्रास दिला होता. ठाकूरच्या जाचाला कंटाळून त्या गरीब माणसाला त्याच्या मालकीची आणि व्यवसायासाठी उपयोगी असलेली जागा कमी भावाने विकावी लागल्याची चर्चा आहे.

रेल्वे स्टेशनच्या आवारात होणाऱ्या गुन्हेगारीच्या प्रकारात सहभागी असलेल्या आरोपींना सुद्धा वादग्रस्त ठेकेदाराची साथ असल्याचीही स्टेशन परिसरात चर्चा आहे. वाशीम शहर पोलीस ठाण्यात पार्कींगच्या वादग्रस्त ठेकेदाराच्या विरोधात गुन्हा दाखल झाल्याचे समजते. वाशीम शहर पोलीसांनी वादग्रस्त ठेकेदाराची कसून चौकशी केल्यास अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

त्या वादग्रस्त ठेकेदाराचा पार्कींगचा ठेका कायमस्वरूपी बंद करावा. यापुढील पार्कींगचा ठेका देण्यापुर्वी रेल्वे प्रशासनाने पारदर्शक प्रक्रिया राबवावी, वाशीम जिल्ह्यात जास्त खप असलेल्या मराठी वृत्तपत्रात पार्कींगच्या ठेक्याची जाहिरात प्रकाशीत करावी तसेच पार्कींगसाठी टिनशेड उपलब्ध करून देण्याची मागणीही विविध सामाजिक संघटना आणि ग्राहक संघटनेने रेल्वे प्रशासनाकडे निवेदनाद्वारे मागणी करण्यासाठी पुढाकार घेतल्याचे समजते.


शनिवार दि. १४ फेब्रुवारी २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...

दादागिरीची ठेकेदारी, अधिकाऱ्यांची भागिदारी !

सिटी न्यूज सुपरफास्ट

शुक्रवार १३ फेब्रुवारी २०२६

माणुसकीला रोजच हरताळ...

रेल्वे पार्कींग वाल्याची पोलीसांनाही शिवीगाळ!

अरेरावीची ठेकेदारी, म्हने कायद्यापेक्षाही भारी

वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...

दादागिरी रोजच पुन्हा-पुन्हा, पोलिसांनीच दाखल केला गुन्हा !

काहीच कारण नसतांना, सिसीटीव्ही कॅमेरे असतांना, पार्कींगचे पैसे देवूनही त्रास विनाकारण

वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्यांची...

दादागिरीची हद्द, ठेका करा रद्द !

रेल्वे समितीचे सदस्य जुगलकिशोर कोठारी व सुरज चौधरी यांनी केली खुद्द

वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगवाल्या...

ठेकेदाराची लूट, अधिकाऱ्यांची सूट !

दादागिरीचा तिढा, ठेका रद्द करण्यासाठी उभारणार लढा

सिटी न्यूज सुपरफास्टचा सततचा पाठपुरावा...

गुरूवार दि. १९ जानेवारी २०२६ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

वाशीम रेल्वे स्टेशनवरील पार्कींगमध्ये...

लूटण्याची सुविधा, मॅनेज निविदा !

दादागिरीची ठेकेदारी, अधिकाऱ्यांची भागिदारी...

## थोडक्यात

### श्री. भोलेनाथ वुद्ध आश्रम वनोजा येथे फरसान, फळ वाटप



● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

स्थानिक श्री. मोतीरामजी ठाकरे शिक्षण प्रसारक मंडळ कासोळा व्दारा संचालित यशवंतराव चव्हाण कला व विज्ञान महाविद्यालय संस्थेचे सचिव मा. चंद्रकांत ठाकरे, प्राचार्य डॉ. राहुल सुर्वे पदवी व पदव्युत्तर समाजशास्त्र विभाग प्रमुख डॉ. देविदास श्रीराम भगत यांच्या मार्गदर्शना खाली २४ फेबुवारी २०२६ रोजी समाजशास्त्र विभागाच्या वतीने वृद्ध आश्रमात विद्यार्थ्यांच्या हस्ते वृद्धाना फरसान, फळे व बिस्किटचे वाटप करण्यात आले. कु. सानिया चांद गारवे, कु. सानि, या महमंद गारवे कु. रुपाली खडीकार, कु. प्रतिक्षा गि-हे कु. निकिता भगत, कु. दिक्षा ठोंबरे, कु. कोमल बेलखेडे, कु. स्वाती भगत, कु. आदिती राऊत, कु. भगवती कांबळे, निलेश चक्रंनारायण, आदित्य भगत, निलेश इंगळे, अनिकेत खंडारे यांनी हा उपक्रम राबविला. डॉ. देविदास भगत यांनी हा उपक्रम दरवर्षी का राबवितो याची सविस्तर माहिती दिली.

### शेगाव येथे करणार राष्ट्रीय आरोग्य मेळावा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

भारत सरकारचे आयुष मंत्रालय, अखिल भारतीय आयुर्वेद महासंमेलन यांच्या संयुक्त विद्यमाने दि. २५ ते २८ फेब्रुवारी २०२६ दरम्यान बुलढाणा जिल्ह्यातील शेगाव येथे चार दिवसांचा 'राष्ट्रीय आरोग्य मेळावा २०२६' आयोजित करण्यात आला आहे. औषधी वनस्पती लागवड आणि कृषी वनीकरणाद्वारे आयुष औषध प्रणालींबाबत सर्वसामान्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे, सर्वसमावेशक आरोग्य सेवा प्रदान करणे आणि शेतकऱ्यांसाठी उपजीविकेच्या नवीन संधी निर्माण करणे हे या मेळाव्याचे उद्दिष्ट आहे.

राष्ट्रीय आरोग्य मेळावा- २०२६ चे उद्घाटन बुधवार २५ फेब्रुवारी २०२६ रोजी मा. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते होणार आहे.

## नागरिकांचा केला जातो 'घात', वसुलीत अनेकांचे 'हात'...

# पैशाशिवाय नाही पडताळल्या 'जात' !

### * जात पडताळणीसाठी द्या दाम, तरच काम, नाहीतर राम-राम

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

समाजकल्याण मधील जात पडताळणी विभागाला भ्रष्टाचाराच्या वाळविणे पोखरून टाकले आहे. जात पडताळणीसाठी नागरिकांना त्रास सहन करावा लागत आहे. समाजकल्याण कार्यालयातील जात पडताळणी विभागात आता पर्यंत शेकडो जात वैधता प्रमाण पत्राचे प्रकरणे प्रलंबित आहे. ते निकाली काढण्यासाठी या विभागातील अधिकारी जाणीव पूर्वक विलंब करीत आहेत. समाज कल्याण विभागातील जात पडताळणी अधिकाऱ्यांना दाम दिल्याशिवाय काम होत नसल्याने सर्वसामान्यांना आर्थिक भूर्दुंडासह त्रास सहन करावा लागत आहे. त्यासाठी १५ ते २० हजार रेट ठरला असून अधिकाऱ्यांची भेट घेवूनच दलाल कामे करीत असल्याचे उघड झाले आहे. ज्या दिला दाम त्याचेच झाले काम बाकीच्यांना राम राम ठोकल्याचेही उघड झाले आहेत.

जात प्रमाणपत्र पडताळणी विभागात अनेक विध्यार्थी, निवडणुकीस सामोरे जाणारे उमेदवार यांना अनेक दिवसांपासून जात प्रमाणपत्र समितीकडे त्रुटीची पूर्तता करून सुद्धा जात पडताळणी विभागामार्फत त्या प्रकारासाठी पैसे दिल्या शिवाय जात पडताळणी होत नसल्याचे प्रकार उघडकीस आले आहेत. त्यामुळे अधिकारी हेतूपुरस्पर जात पडताळणी करण्यासाठी विलंब लावत आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या नौकरी शिक्षण संबंधात अनेक अडचणी येत आहेत तसेच ग्रामपंचायत निवडणुकी संदर्भात अनेक निवडून आलेले उमेदवार दिलेल्या वेळेत आपले जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करू न शकल्या मुळे त्यांना आपल्या पदाकरीता अपात्र ठरविण्यात आले.

मात्र, आर्थिक देवाण घेवाणातून




अपात्रांनाही पात्र दाखविण्यात येत आहे. लक्ष्मीदर्शनाशिवाय जात पडताळणी अधिकारी कागदाचे दर्शनही करत नाहीत. जात पडताळणीच्या कामासाठी अधिकाऱ्यांनी ठरावीक दलाल ठेवले असून प्रत्येक कामाचा रेट ठरला आहे. ग्रामपंचायत सदस्याची जात पडताळणी करायची झाल्यास १५ ते २० हजार रूपये रेट द्यावा लागतो. राजकीय लोकांनाही जात पडताळणीसाठी त्रास सहन करावा लागतो, तर सामान्य विद्यार्थ्यांची काय स्थिती असेल हे यावरून सिध्द होते.

दाम न देता एकाही व्यक्तीची जात पडताळणी झाली असे शोधूनही सापडणार नाही, थेट राजकारणाही जात पडताळणीसाठी दाम दिल्याचे सिटी न्युज सुपरफास्टशी बोलून दाखविले. आता सिटी न्युज सुपरफास्टच्या वृत्त मालिकेनंतर विविध राजकीय व सामाजिक संघटना जात पडताळणी विभागाच्या विरोधात निवेदने देवून रस्त्यावर उतरून आंदोलन करणार आहेत. अगोदरच विविध जातीच्या आरक्षणासाठी सामाजिक संघटना रस्त्यावर उतरल्या असतांनाही जात पडताळणीसाठी भ्रष्ट अधिकारी दाम देवूनही त्रुटीच्या नावाखाली त्रास देत असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे नागरिकांच्या व सामाजिक संघटनेच्या सहनशिलतेचा अंत संपला असून आता नागरिक स्व:ताहून मोठे आंदोलन उभारण्याच्या तयारीत आहेत.

## गावातील स्वच्छता सुविधा शाश्वत राखण्यासाठी महिलांनी पुढाकार घ्यावा

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

शेग्रीगेशन शेड अर्थात कचरा विलगीकरण केंद्र, सार्वजनिक शौचालय, घंटागाडी सार्वजनिक, कचरा कुंड्या इत्यादी सुविधा ग्राम पंचायत स्तरावर उपलब्ध असुन त्याच्या शाश्वततेसाठी गावातील महिलांनी पुढाकार घ्यावा असे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकार अर्पित चौहान यांनी (दि. २४) स्थानिक गुलाटी हॉटेल मध्ये आयोजित कार्यशाळेत केले. स्वच्छ भारत मिशन टप्पा-२ अंतर्गत कचऱ्याचे विलगीकरण



सार्वजनिक स्वच्छता आणि वर्तणूक बदल घडविणे बाबत दोन दिवशी प्रशिक्षणाच्या समारोप कार्यक्रमात सीईओ चौहान यांनी महिलांशी संवाद साधला. यावेळी जिल्हा पाणी व स्वच्छता मिशन कक्षाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी धैर्यशील पाटील एएफसी इंडिया लिमिटेड संस्थेचे राज्य समन्वयक केशव घीगे, क्षमता बांधणे तज्ञ प्रफुल्ल काळे, मनुष्यबळ विकास सल्लागार शंकर आंबेकर आणि जनसंपर्क अधिकारी राम श्रृंगारे यांची उपस्थिती होती. सीईओ चौहान म्हणाले बचत गटातील महिलांनी पारंपारिक व्यवसायाच्या चाकोरीतून बाहेर येऊ नाविन्यपूर्ण व्यवसायात उतरावे. शासनाच्या वतीने तालुक्यातील एका गावामध्ये प्लास्टिक व्यवस्थापन प्रकल्प उभारण्यात आला सक्षम बचत गटांनी हा प्रकल्प चालवण्यासाठी पुढाकार घ्यावा. जिल्हा परिषद अशा बचत गटांना प्राधान्य देईल अशी आश्वासन दिले.

## तहसील कार्यालयात शौचालयातच घाणीचे साम्राज्य !

### अधिकाऱ्याने स्वतःसाठी बाथरूमला ठोकले ताले

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर तहसील कार्यालय हे तालुक्यातील महत्त्वाचे प्रशासकीय केंद्र मानले जाते. दररोज विविध शासकीय कामांसाठी शेकडो नागरिक येथे ये-जा करतात. मात्र, कार्यालय परिसरात सर्वत्र कचऱ्याचे ढीग, अस्वच्छ शौचालये आणि दुर्गंधीमुळे नागरिकांची गैरसोय होत आहे.

संडास व बाथरूमची नियमित स्वच्छता होत नसल्याची तक्रार अधिकाऱ्याने आपल्या मर्जीप्रमाणे स्वतः युज करण्यासाठी बाथरूमला लॉक केले आहे नागरिकांसाठी बाथरूमची व्यवस्था नसून तहसील परिसरातील बाथरूमचा एक किलोमीटर पर्यंत वास सुटला आहे तरी अधिकारी झोप काढत आहे तहसील कार्यालय व उपविभागीय कार्यालय दोन्ही अधिकारी कोणत्या प्रकारे नागरिकांना सुख सुविधा देऊ शकत नाही असे आढळून येत आहे असे मत नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. पिण्याच्या पाण्याजवळही अस्वच्छता असल्याचे दिसून येत असून त्यामुळे आरोग्याच्या समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

**प्रशासनाचे दुर्लक्ष?**

तहसीलदार कार्यालयाच्या देखरेखीखाली येणाऱ्या परिसरात इतकी अस्वच्छता असताना अद्याप





ठोस कारवाई झालेली नाही, अशी चर्चा आहे. संबंधित विभागाने तातडीने स्वच्छता मोहीम राबवून नियमित साफसफाईची व्यवस्था करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. तहसील कार्यालय मध्ये तीन चार शिपाई असून एक दिवस पण ऑफिसमध्ये हप्ता मधून साफसफाई केल्या जात नाही संडास बाथरूम जर बघितले तर सार्वजनिक ठिकाणी पण एवढी घाण बघण्यास मिळत नाही अधिकारीला स्वतःकडे एक प्रश्नल बाथरूम ठेवली आहे त्याला लॉक केले आहे महिला कर्मचाऱ्यांसाठी त्यांनी पण तहसील कार्यरतला बाथरूमला ताला ठोकला आहे बाकी शेकडो लोक तेसील कार्यालयामध्ये कामानिमित्त येतात त्यांना त्या घाणीचा तेवढा वास दुर्गंध येतोय पण जनतेच्या सोयीसाठी कोणत्याच प्रकारे बाथरूमची व्यवस्था नाही आहे. मंगरूळपीर तहसील कार्यालयातील ही परिस्थिती लवकरात लवकर सुधारावी, अन्यथा नागरिकांच्या आरोग्यावर त्याचे दुष्परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.


# शेलुबाजार परिसरात अवैध धंद्यांना उधान !

### *अवैध धंद्यांमुळे अनेकांचे कुटुंब होतेय उद्ध्वस्त *अवैध धंद्यामुळे महिलां त्रस्त

● संतोष चव्हाण @ मंगरूळपीर ●

शहरामध्ये विविध धंद्याला ऊत आला असून प्रशासनाचे याकडे दुर्लक्ष होत आहे अवैधरित्या प्रवासी वाहतूक करणे दारू विक्री चिडीमारी शहरात कळस गाठला आहे यांचा त्रास महिला सह अन्य नागरिकांना सहन करावा लागत आहे त्यामुळे शहरात आजूबाजूच्या परिसरात सुरू असलेले हवेद्य धंद्यांना आळा घालण्याची मागणी येतील नागरिकाकडून होत आहे.

शेलुबाजार मध्ये आर एस कॉन्व्हेंट तसेच भारत हॉटेल व शेलुबाजार रोड मटन मार्केट च्या बाजूला मा. जि. जि प .सदस्य तसेच त्यांचे सहकार्य एकुण ३०व्यक्तीच्या सहकार्य ने. पेडगावत. शेलुबाजार चालू असलेले वरली मटका त्रास गेल्या काही वर्षात तरुणाईमध्ये वाढत असलेल्या कमी गुंतवनुक करुन जास्त नफा कमावण्याच्या मानसिकतेमुळे अवैध धंद्याकडे अनेक तरूणांचा कल वाढला आहे. त्याचाच फायदा घेत शहरात अवैध धंद्यात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली दिसत आहे. अशा धंद्याकडे तरूणां वाढलेला कल आणि पोलिस विभागाकडून त्याकडे करण्यात येणारे दुर्लक्ष यामुळे अवैध धंद्यांना जणु मोकळे रानच मिळाले आहे. शहरातील विविध भागात सुरू असलेल्या या अवैध धंद्यांमुळे आता शहरातील अवैध धंद्यांना पोलिसांनी 'एनओसी'च दिली की काय, असा प्रश्न सर्वसामान्यांमध्ये उपस्थित केल्या जात आहे. बारावीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर शहरासह ग्रामीण भागातील तरूण कमी गुंतवणुकीचा व्यवसाय म्हणुन पाणठेला, चहाची टपरी अशा व्यवसायाकडे वळत होते. मात्र, आता कमी गुंतवणुकीत जादा नफा



कमावण्याच्या नादात दारूविक्री, सट्टा पट्टी, जुगार, मटका अशा अवैध धंद्याकडे त्यांचा कल वळल्याचे दिसून येत आहे. पान ठेला किंवा चहा टपरीच्या माध्यमातून दहा वर्षांत जेवढा पैसा कमावता येणार नाही, तेवढा पैसा अवैध धंद्यात केवळ दोन ते तीन वर्षांत कमावता येतो असा त्यांचा समज आहे. त्यामुळे अधिक पैसा कमावण्याच्या लालसेनेच जिल्हाभर दारूचा व्यवसाय गृह उद्योग तर सट्टा पट्टी उदरनिर्वाहाचे साधन झाले आहे. तरूणांनी सट्टा पट्टीला स्वत:च्या उदरनिर्वाहाचे साधन बनविले आहे. घरून पाहिजे तेवढा पॉकेटमनी मिळू शकत नाही, घरून मिळालेल्या पॉकेटमनी मध्ये तरूणांच्या गरजा भागू शकत नाहीत, यावर तरुणांनी उपाय शोधला असून, सट्टा पट्टीवर पैसा लावून जादा पैसा कमावण्यात तरूण लागले आहेत. सट्टा पट्टीवर तरूणांना सव्वा रूपयात शंभर रूपये मिळविता येत आहेत. क्रमांकाच्या अंदाजावर आकडेमोड करून सट्टूयाचे गणित मांडल्या जात आहे. तरुणांसोबत शासकीय सेवेतील कर्मचारी देखील सट्टूयाच्या आहारी गेले आहेत. मात्र या नादात पैसा मिळवण्यापेक्षा गमावणाऱ्यांची संख्या वाढत आहे. त्यातुनच कर्जबाजारीपणा आणि नशेच्या आहारी जाणारे तरुण अनपेक्षितपणे गुन्हेगारी कडेही वळत आहे.

या सट्टा पट्टीच्या नादी लागुण कित्येक तरुण दिवसभर आकडे मोडीच्या गणिताचा अभ्यास करीत असतात. शहरात कित्येक सट्टा पट्टी दलालांनी पट्टी घेण्याचे कार्यालय लावलेले आहे. या अवैध धंद्यांनी कित्येक कुटुंब उद्ध्वस्त केले आहेत. तरीही या धंद्याच्या नादी लागणाऱ्यांची संख्या कमी झालेली नाही. या व्यवसायाबद्दल आरडाओरड झाल्यास काही दिवसांसाठी हे व्यवसाय छुप्या पद्धतीने चालविण्यात येतात. त्यानंतर मात्र, परिस्थिती जैसे थे असते शेलुबाजा हद्दीत खुलेआम सट्टापट्टीसह इतर अवैध व्यवसाय सुरू आहे. मात्र असे असतानाही या पोलिस चौकी कडून त्यांच्यावर कारवाई होत नसल्याचे दिसून येते. थातूरमातूर चौकशी होते व सोडून दिल्या जाते त्यामुळे आता जिल्हा पोलिस अधीक्षक यांनीच या गंभीर बाबीकडे लक्ष पुरवावे अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

सिटी न्यूज सुपरफास्ट वऱ्हाड
गुरुवार, दि. २६ फेब्रुवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# एसीबीच्या जाळ्यात अडकलेल्या डॉ. प्रवीण लोखंडे यांचा विषय विधानसभेत गाजला

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अकोला :** मॅट ने बदली रद्द केल्यानंतर घाईत ज्वाईन होणाऱ्या सहकार उपनिबंधक प्रविण लोखंडे यांच्या विषयीची बातमी आर आर सी न्यूज ने प्रसारीत केली होती. ती बातमी सिटी न्यूज सुपरफास्टने उजेडात आणली होती. आज विधीमंडळात आ.रणधीर सावरकर यांनी प्रविण लोखंडे यांच्या मार्फत सहकार विभागातील अनागोंदी उघड केली.




विधीमंडळात सभागृहामध्ये लक्षवेधी सूचनेवर चर्चा करताना चंद्रपूर जिल्ह्यातील एका अल्पभूधारक शेतकऱ्याला खाजगी सावकाराच्या कर्जामुळे किडनी विकायची पाळी आली या मधे आंतरराष्ट्रीय टोळी कशी कार्यरत आहे या विषयावर चर्चा सुरू असताना, अकोला जिल्ह्यातील खाजगी सावकारी आणि सहकार खात्यातील संगणमत करणारे जिल्हा उपनिबंधक अधिकारी यावर प्रकाश टाकताना आमदार सावरकर यांनी अकोला जिल्ह्यातील खाजगी सावकारी आणि जिल्हा उपनिबंधक डॉ. प्रवीण लोखंडे यांच्या विषयीचा किस्सा सभागृहात विशद केला. एखाद्या डीडीआरला दोन वेळा लाच खात्याकडून पकडून दोषी ठरवले जाते त्याची अन्यत्र बदली करण्यात येते. त्याच्या प्रकरणाची चौकशीची परवानगी नाकारुन भ्रष्ट अधिकाऱ्यांना कसे पाठीशी घातले जाते, भ्रष्ट असलेला हा जिल्हा उपनिबंधक डॉ. लोखंडे जिल्ह्यामध्ये एका जीएसटी अधिकारी यांच्या सोबत संगनमत करून पकडल्यानंतर सुद्धा त्याला अकोला या ठिकाणी शासन त्यांची पद स्थापना कशी करते. ह्या सगळ्या बाबी सभागृहात विषद करून राज्यातील सावकारी आणि सहकार खात्यातील अधिकारी यांच्या संगणमताने शेतकऱ्यांची कशी लूट होत आहे. याचा ज्वलंत उदाहरण सभागृहात कथन करून अशा भ्रष्ट अधिकाऱ्यांवर शासन कारवाई करणार आहे की नाही त्यांना निलंबित करणार आहे की नाही याबाबत मागणी केली आमदार सावरकर यांच्या प्रश्नाला उत्तर देताना राज्यमंत्री पंकज भोयर यांनी या प्रकरणावर कारवाई करण्यात येणार असल्याचे आश्वासन सभागृहात दिले

# राजराजेश्वर मंदिरात संजयभाऊ धोत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिषेक

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी



**अकोला :** राजराजेश्वर मंदिरात माजी मंत्री संजय धोत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त अभिषेक करण्यात आला. यावेळी खासदार अनुप धोत्रे, महापौर शारदा खेडकर, माजी महापौर विजय अग्रवाल, जयंत मसने, किशोर पाटील, नगरसेविका वैशाली शेळके, मंजुषा शेळके, नगरसेवक नितीन ताकवाले, अमोल मोहोकार, अनिल गरड, सतीश ढगे, तुषार भिरड, वसंत माने, संतोष पांडे, राजेश्वर संस्थानाचे विश्वस्त गजानन घोंगे, जोशी यांच्यासह भाजप, भाजयुमो कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# बारा ज्योतिर्लिंग मंदिरात अभिषेक व महाआरती

**अकोला :** माजी केंद्रीय मंत्री संजय भाऊ धोत्रे यांच्या वाढदिवसानिमित्त गुरूवारी सकाळी रणपिसे नगरातील बारा ज्योतिर्लिंग मंदिरात अभिषेक व महाआरती करण्यात आली. भारतीय जनता पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी संजय धोत्रे यांच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. खासदार अनुप धोत्रे, महानगर अध्यक्ष जयंत मसने, किशोर पाटील, ॲड. सुभाषसिंग ठाकूर, ॲड. देवाशीष काकड, उकंडराव सोनोने, संदीप गावंडे, नगरसेवक प्रशांत जोशी, सागर शेगोकार, वरोकारताई, सुभाष खंडारे, चंदाताई शर्मा, वर्षा गावंडे, रश्मी अवचार, उमेश श्रीवास्तव, प्रशांत अवचार, ऋषीकेश रुईकर, शंकर कपले यांच्यासह भाजप, भाजयुमो कार्यकर्ते, परिसरातील नागरिक उपस्थित होते.



# आता खास अकोलेकरांसाठी सुप्रसिद्ध कार्डिन कंपनीचा डायरेक्ट फॅक्टरी सेल

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

♦ अमृतवाडीमध्ये रविवार पर्यंत ग्राहकांसाठी बंपर ऑफर

**अकोला :** ग्राहकांच्या पसंतीस उतरलेल्या कार्डिन कंपनीचा डायरेक्ट फॅक्टरी सेल अमृतवाडीमध्ये बुधवारपासून सुरू झाला आहे. बुधवार ते रविवार असे पाच दिवस ग्राहकांसाठी सेल राहील. एका खरेदीवर एक फ्री, दोन खरेदीवर तीन फ्री आणि तीन खरेदीवर पाच फ्री अशी बंपर ऑफर राहील. सेलचा शुभारंभ झाल्यापासून खरेदीसाठी ग्राहकांची गर्दी दिसून आली. विशेष म्हणजे अकोल्यात पहिल्यांदा कार्डिन कंपनीने सेल भरवला आहे. कार्डिन कंपनीचे शर्टस, ट्राऊझर, १०० टक्के कॉटन शर्टस, पँटस, जीन्स






तसेच साड्यांचे भरपूर स्टॉक अमृतवाडीमध्ये उपलब्ध करून देण्यात आला आहे. युवक, युवती, महिला, पुरूषांची खरेदीसाठी गर्दी झाली आहे. ग्राहकांना आकर्षक ऑफर उपलब्ध झाल्यामुळे ब्रँडेड कपडे खरेदी करण्याकडे त्यांची ओढ दिसत आहे. जागतिक ख्यातनाम कार्डिन कंपनीचे कपडे, साड्या रास्त दरात उपलब्ध असल्याने ग्राहकांनी संधीचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# पत्रकार कॉलनीत रस्त्याचे अर्धवट काम त्रासदायक



प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अकोला :** पत्रकार कॉलनीत गेल्या अनेक दिवसां पासून जलवाहिनी टाकण्याचे काम सुरू होते. खोदकाम झाल्यावर काही खड्डे बुजवण्यात आले. परंतु बरेचसे तसेच ठेवले. तसेच रस्त्याचे सपाटीकरण चांगले झाले नाही. त्याचा त्रास या भागातील रहिवासी तसेच वाहन चालकांना होत आहे. या भागात खड्डे खणल्यामुळे नागरिकांना सुरूवातीला अडचण सोसावी लागली. परंतु काम झाल्यावर रस्ता चांगला करून देण्याची जबाबदारी संबंधित कंत्राटदाराची नाही का की त्यातून सुट दिली आहे अशी विचारणा केली जात आहे.

# धान्य वितरण व्यवस्थेत लवकरच होणार बदल

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

♦ ई-पॉस मशिनसोबत जोडले जाणार वजन काटे

**अकोला :** रेशन दुकानांमधील धान्याचा काळाबाजार रोखण्यासाठी आणि पुरवठा व्यवस्था अधिक पारदर्शक करण्यासाठी प्रशासनाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. आता लवकरच जिल्ह्यातील सर्व रेशन दुकानांमधील ई-पॉस मशिन्स ऑनलाइन वजनकाट्यांशी जोडल्या जातील. या प्रणालीद्वारे थेट रेशन कार्डधारकांना धान्याचे वाटप केले जाणार आहे. या निर्णयामुळे धान्याच्या काळ्याबाजाराला मोठ्या प्रमाणात आळा बसेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. राज्य सरकारने धान्य पुरवठा साखळी अधिक पारदर्शक करण्यासाठी हा नवा निर्णय घेतला आहे. अकोला जिल्ह्यासह संपूर्ण राज्यातील सर्व रास्त धान्य दुकानांमध्ये ई-पॉस मशिन्स आणि वजनकाटे ऑनलाइन पद्धतीने एकमेकांना जोडले जातील. पूर्वी ई-पॉस मशिनवरील नोंद आणि वजनकाट्यावर दिलेल्या धान्याचे प्रत्यक्ष वजन यामध्ये तफावत असायची.

काही ठिकाणी धान्याचा काळाबाजार होत असल्याच्या तक्रारीही समोर आल्या होत्या. मात्र, आता या नवीन प्रणालीमुळे मशिनमधील नोंद आणि प्रत्यक्षात वाटप केलेले धान्य यांचे वजन तंतोतंत जुळणार आहे, ज्यामुळे गैरप्रकारांना चाप बसेल. अकोला जिल्ह्यात एकूण एक हजार एकसष्ट रेशन दुकाने असून साडेतीन लाखांहून अधिक रेशन कार्डधारक लाभार्थी आहेत. या सर्वांना लवकरच ऑनलाइन वजनकाट्याद्वारे धान्य वाटप केले जाईल. याचबरोबर सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये आणखी एक मोठा बदल केला जाणार आहे. ई-रेशन कार्डऐवजी आता 'स्मार्ट कार्ड' देण्याची योजना सरकारच्या मंजुरीनंतर लवकरच लागू केली जाईल. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, येत्या काही महिन्यांत सर्व लाभार्थ्यांना हे स्मार्ट कार्ड उपलब्ध करून दिले जातील. जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांनी 'सिटी न्यूज'शी बोलताना ई-पॉस मशिनमध्ये झालेल्या या सुधारणांबाबत सविस्तर माहिती दिली.

# श्यामबाबांच्या फाल्गुन पाट उत्सवात भजनांच्या तालावर भक्त रंगले

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अकोला :** श्री रामदेवबाबा व श्री श्यामबाबा मंदिरात सेवा समितीच्या वतीने फाल्गुन महिन्यानिमित्त फागण फुलांची होळी उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात भजन गायक दिपेश वर्मा तसेच श्याम भक्तांचे लाडके तनिष्क वासरानी यांनी मधुर वाणीतील सादरीकरणाने उपस्थितांना मंत्रमुग्ध केले. 'किर्तन की है रात ष्ठ बाबा शाम थाने आनो है', 'म्हारो श्याम बडो रंगीलोष्ठ', 'ओ रामसापीरष्ठ' यांसारख्या एकापेक्षा एक हिंदी व राजस्थानी भजनांनी मंदिर परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. भजनांच्या तालावर भक्तांनी आनंदाने नृत्य करत उत्सवाची रंगत वाढवली. फागुन फुलांच्या होळीच्या या पावन सोहळ्यात श्री श्यामबाबा व श्री रामदेवबाबांच्या जयघोषात भक्तांनी एकमेकांवर गुलाल व फुलांची उधळण करत होळी उत्सव साजरा केला. संपूर्ण परिसरात भक्तिमय, आनंददायी वातावरण अनुभवायला मिळाले. श्री श्यामबाबा फाल्गुन उत्सवानिमित्त मनमोहक झांकीसह उद्या भव्य निशाण यात्रा फाल्गुन शुक्ल एकादशीच्या पावन पर्वानिमित्त



पुराना शहरातील ओल्ड सिटी ग्रुपच्या वतीने आज श्री श्यामबाबांच्या फाल्गुन उत्सवानिमित्त भव्य निशाण यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. डाबकी रोडवरील नंदाने मंगल कार्यालय येथून सकाळी ७.०० वाजता श्री श्यामबाबांच्या मनमोहक झांकीचे पूजन करून यात्रेला प्रारंभ होणार आहे. ही यात्रा गजानन



महाराज मंदिर, विठ्ठल मंदिर, जय हिंद चौक, सिटी कोतवाली, खोलेश्वर, अनिकट चौक मार्गे श्री रामदेवबाबा–श्री श्यामबाबा मंदिर येथे पोहोचणार आहे. मंदिरात महाआरती व अल्पोहारानंतर शेकडो श्याम भक्त श्यामभजनांच्या धुनीवर भक्तिरसात तल्लीन होत बोरगाव मंजू येथील स्वयंभू श्यामबाबा मंदिराकडे प्रस्थान करतील. बोरगाव मंजू येथे विधिवत पूजन-अर्चना करून फाल्गुन उत्सव साजरा करण्यात येणार आहे. या भव्य निशाण यात्रेत श्री श्यामप्रेमी भक्तांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन जुने शहर श्याम परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे. होळी उत्सवानिमित्त भजन संध्या उद्या होळी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर प्राचीन श्याम बाबा मंदिरात भक्तिमय भजन संध्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा कार्यक्रम शुक्रवार २७ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत प्राचीन श्याम बाबा मंदिर, एमराल्ड कॉलनी, गीता नगर, अकोला येथे होणार आहे. भाविकांनी कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले आहे.

# माजी राज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील यांच्यावर नवीन जबाबदारी, राजकीय पुनरागमनाची नांदी!

♦ केरळ विधानसभा निवडणुकीची सोपविली जबाबदारी!

प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अकोला :** राजकारणातील शिस्त, अभ्यासू वृत्ती यासाठी ओळखले जाणारे राज्यमंत्री डॉ. रणजीत पाटील यांच्यावर केंद्रीय नेतृत्वाने मोठा विश्वास टाकत केरळ विधानसभा निवडणुकीची महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे. केंद्रीय नेतृत्वाने दाखविलेला हा विश्वास केवळ औपचारिक नसून डॉ. पाटील यांच्या राजकीय पुनरागमनाची ठोस नांदी मानली जात आहे.

दक्षिण भारतातील राजकारणात महत्त्वाचे स्थान असलेल्या केरळ विधानसभा निवडणुकीसाठी पक्षाने आखलेल्या रणनीतीत डॉ. पाटील यांना केंद्रस्थानी भूमिका देण्यात आली आहे. विशेषत: केरळ राज्यातील पाला विधानसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी प्रमुख पदाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. हा मतदारसंघ राजकीयदृष्ट्या संवेदनशील मानला जात असल्याने पक्षासाठी ही जबाबदारी अत्यंत निर्णायक ठरणार आहे.

गेल्या काही काळात तुलनेने शांत असलेली त्यांची राजकीय घडामोडींतील उपस्थिती आता नव्या जोमाने पुढे येणार असल्याचे संकेत मिळत आहेत. संघटनशक्तीला धार देत निवडणूक यंत्रणा मजबूत करण्यावर त्यांचा भर राहणार असल्याची माहिती सूत्रांकडून समोर येत आहे.

# युसुफ अली खदान भागात मुख्य रस्त्यावरील अतिक्रमण काढले



प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**अकोला :** महानगरपालिका आयुक्त डॉ.सुनील लहाने, मनपा उपायुक्त विजय पारतवार आणि दक्षिण झोन कार्यालयाचे सहा.आयुक्त देवीदास निकाळजे यांच्या मार्गदर्शनात २५ फेब्रुवारी रोजी युसूफ अली खदान येथील येण्या-जाण्याच्या रस्त्यामध्ये अतिक्रमित पक्के बांधकाम, शासकीय धान्य गोडाऊन, खदान येथील मुख्य रस्त्यावर असलेले भंगारचे दुकान, तार फेन्सींग, आणि शासकीय धान्य गोडाऊनच्या आवार भिंतीला लागून असलेले टीनशेडच्या अतिक्रमण हटवले.

अकोला शहरातील मुख्य रस्त्यावरील वाहतुकीस अडचण निर्माण करणारे अतिक्रमण संबंधीत अतिक्रमण धारकांनी स्वत: आपले काढून मनपा प्रशासनास सहकार्य करावे अन्यथा मनपा प्रशासनाव्दारा संबंधीत अतिक्रमण काढण्यात येणार आहे कृपया संबंधीतांनी याची नोंद घेऊन मनपा प्रशासनास सहकार्य करावे. या कारवाईत सहा.अतिक्रमण निर्मुलन अधिकारी चंद्रशेखर इंगळे, कनिष्ठ अभियंता प्रतीक कट्यारमल तसेच दक्षिण झोन कार्यालय येथील कर्मचा-यांचा समावेश होता.

# शेतकरी व दूध उत्पादकांना आर्थिकदृष्टीने सक्षम करणार : आमदार हरीश पिंपळे


प्रतिनिधी २६ फेब्रुवारी

**मुर्तीजापुर :** शेतकरी व दूध उत्पादकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणार व केंद्र सरकार, राज्य सरकार आणि पशुसंवर्धन विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध दूध उत्पादनवाढीच्या योजनांबाबत जिल्हाधिकारी यांच्या दालनात महत्त्वपूर्ण बैठक घेणार असल्याचे प्रतिपादन आमदार हरीश पिंपळे यांनी दूध उत्पादक संघाच्या बैठकीत केले.

या बैठकीत शेतकऱ्यांना व दूध उत्पादकांना शासकीय योजनांचा पूर्ण व प्रभावी लाभ कसा मिळवून देता येईल, याबाबत सखोल चर्चा करण्यात आली. संबंधित योजनांची अंमलबजावणी अधिक गतीने व पारदर्शक पद्धतीने करण्यासाठी प्रशासन स्तरावर ठोस प्रयत्न केले जातील, असे आश्वासन आमदार हरीश पिंपळे यांनी उपस्थितांना दिले. यावेळी त्यांनी स्पष्टपणे सांगितले की, 'दूध उत्पादन क्षेत्र मजबूत



झाले तर ग्रामीण अर्थव्यवस्था अधिक सक्षम होईल. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांपर्यंत योजनांचा लाभ पोहोचवण्यासाठी सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करणे गरजेचे आहे.' जिल्हा दूध उत्पादक संघाचे अध्यक्ष प्रशांत हजारी यांनी बैठकीत सर्व दूध उत्पादक संस्था व शेतकऱ्यांना महत्त्वपूर्ण आवाहन केले. त्यांनी सांगितले की, जे दूध उत्पादन सुरू करण्याच्या तयारीत आहेत किंवा बंद अवस्थेत आहेत त्यांनी तातडीने उत्पादन सुरू करावे. शासनाच्या विविध अनुदान व प्रोत्साहन योजनांचा लाभ घ्यावा संघटनात्मक पातळीवर सक्रिय सहभाग नोंदवावा यामुळे दूध उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्नही लक्षणीयरीत्या वाढू शकते, असा विश्वास शेवटी प्रशांत हजारी यांनी व्यक्त केला. आयोजित अकोला जिल्हा दूध संघाच्या मासिक बैठकीत आमदार हरीश पिंपळे अध्यक्ष प्रशांत हजारी, शिवा मोहाड उपाध्यक्ष दूध संघ अकोला, नाना भाऊ भिसे सदस्य व इतर सदस्य राहुल गांधी, साहेबराव जाधव, अन्सार खाँ, ब्रह्म पांडे अकोट, सौ नूतन ताई हरीश पिंपळे, वंदना ताई आगे, प्रभाकर नगराळे व्यवस्थापक गोविंदराव आगे, सहायक शाम पांडे, शासकीय दूध व्यवस्थापक सोळंके सर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व्यवस्थापक गोविंदराव आगे यांनी केले तर आभार साहेबराव जाधव (घोटा) यांनी मानले शेतकऱ्यांना योजनांची माहिती पोहोचवणे प्रत्यक्ष लाभ मिळण्यात येणाऱ्या अडचणी दूर करणे दूध उत्पादक संस्थांना पुन्हा सक्रिय करणे उत्पादन वाढीस चालना देणे हा बैठकीचा उद्देश होता.




हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी भास्कर प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट क्र. टी- ५१ एम. आय. डी. सी. फेज - ४, अकोला ग्रोथ सेंटर, येवता रोड, शिवणी, अकोला - ४४४००२ येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले. ▪ **मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख** ▪ **संपर्क –** 0724-2435573, 2444774 - email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135

CMYK CMYK